म. ग्रं. सं. ठाणे
विषय ग्रं प्रकार
क्र. १५०
REFBK-0019719

म. ग्रं. सं. ठाणें
७००

श्रीमंत रा. रा. रघुनाथराव विठ्ठल

उर्फ अण्णासाहेब विंचूरकर,

उमदे तुलमुलक बहादूर

कंपानियन ऑफ धि मोस्ट एक्झाल्टेड ऑर्डर

ऑफ थि स्टार ऑफ इंडिया,

विंचूर संस्थानचे मालिक

ह्यांचे चरणीं

हें पुस्तक

REFBK-0019719

नजर केलें असे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र.

# प्रस्तावना.

मनुष्यांस ज्या गोष्टी केल्या पाहिजेत त्यापैकीं कांहीं गोष्टी शास्त्रकारांनीं धर्मांत गोंविल्या आहेत, व त्यांच्या कृताऽकृताबद्दल पापपुण्याचा बोजा लादलेला आहे. त्यामुळें पुष्कळ पापभीरु लोक त्याप्रमाणें वागतात.

ज्ञानप्राप्ति होण्यास अवश्य साधन जें देशाटन तें मनुष्याकडून घडत असावें, ह्मणून यात्रा करण्याची अवश्यकता धर्मांत सांगितली आहे.

हिंदुस्थानांतील प्रसिद्ध त्र्यंबक क्षेत्राचें हें वर्णन, मिळाली तेवढी खात्रीलायक माहिती मिळवून लिहिलें आहे. ऐकींव व पौराणिक भाग यांत मुळींच नाहीं.


रा. रा. विनायक कोंडदेव ओक व महादेव बाळकृष्ण भट ह्या विद्वान् गृहस्थांनीं ह्या पुस्तकाची कच्ची प्रत तपासून पाहिली ह्मणून पुस्तककर्ते त्यांचे फार आभारी आहेत.

ह्या दुसऱ्या आवृत्तींत पौराणिक भाग घातला असून शिवाय दुसरी पुष्कळ सुधारणा केली आहे. हीसही पूर्वींप्रमाणेंच लोकाश्रय मिळेल अशी आशा आहे.

# अनुक्रमणिका.

| | | |
|---|---|---|
| | | पृष्ठांक. |
| **भाग पहिला—** | प्राचीन माहिती.... | १ |
| **भाग दुसरा—** | यात्रावर्णन.... | १० |
| **भाग तिसरा—** | सांप्रतची स्थिति.... | १४ |
| | कुशावर्त तीर्थ .... | १५ |
| | त्र्यंबकेश्वराचें देवालय.... | १५ |
| | लवाजमा.... | २५ |
| | संस्थानचे व्यवस्थेसाठीं नोकर.... | २६ |
| | देवाचे उपचार .... | २८ |
| | **स्थलवर्णन....** | २९ |
| | लांबी, रुंदी व मर्यादा.... | ,, |
| | घरें व लोकसंख्या .... | ,, |
| | जनावरें.... | ,, |
| | वसूल .... | ,, |
| | धंदा .... | ३० |
| | डोंगर .... | ,, |
| | नद्या .... | ,, |
| | हेमाडपंतीं कृत्यें.... | ,, |
| | यात्रा व उत्साह.... | ,, |
| | आखाडे.... | ३१ |
| | अन्नसत्रें.... | ,, |
| | धर्मशाळा .... | ,, |

| | पृष्ठांक |
|---|---|
| हवा.... .... .... .... .... .... | ३२ |
| पाणी .... .... ... .... .... | ,, |
| चमत्कार .... .... .... .... .... | ,, |
| नवीनचाल .... .... .... .... | ,, |
| मेळा.... .... .... .... .... .... | ३३ |
| **कालपरत्वें स्थिति** .... .... .... | ३४ |
| **सांप्रतची सुधारणा** .... .... .... | ३६ |
| पोस्टऑफिस .... .... .... .... | ,, |
| पोलिस .... .... .... .... .... | ,, |
| म्युनिसिपालिटी........ .... .... | ,, |
| शाळा........ ........ .... .... | ,, |
| पुस्तकालयें.... .... .... .... .... | ,, |
| सूचना .... .... .... .... .... | ३७ |
| **भाग चौथा–** पौराणिकमाहिती .... .... | ३८ |
| देवळें, तीर्थें, वगैरे बद्दल माहिती .... | ४१ |



त्र्यंबकेश्वराचें देवालय.

# त्र्यंबकवर्णन.

## भाग १ ला.

### प्राचीन माहिती.

श्लोक.

वामांक दाक्षायणिनें विराजे, विघ्नांतकें दक्षिण अंक साजे ॥ या शंकराच्या नमितों पदाला, तो स्फूर्ति दे त्र्यंबकवर्णनाला ॥१॥

स्रग्धरावृत्त.

होते या त्र्यंबकाचे प्रथमचि गवळी भूप दीन प्रजा ती ॥ धर्माची हानि केली मग यवननृपीं गांजिली हिंदुजाती ॥ गाजी बाजी सुयुद्धें करुनि बहुतसे लोक राजी करी तो, किल्ला तैं घेतला हो सुखद परम जो कालचक्रें करीं तो ॥ १ ॥

जगाच्या रहाटीकडे विचारपूर्वक पाहिलें असतां, मोठमोठाले फेरफार दिसून येतात. अनेक हिंस्र पशूंनीं गजबजलेलीं अरण्यें व उंच सुखलप्रदेश, रमणीय नगरें बनलीं आहेत. जेथें मनुष्यवसतीचा अभाव असावयाचा,

१८७९८

अशा ठिकाणींही अनेक प्रयत्न करून मनुष्यांनीं नोंदणूक करून घेतली आहे.

अरण्यांत उंचवट्यावर अंतराअंतरानें काहीं झोंपडीं जवळः भाजीपाल्याचा एकादा वेल, व त्यापलीकडे सभोंवार कांट्यांचें मजबूत कुपण आहे; तेथून वऱ्याचं अंतरावर खोलगट जागीं वाहता ओढा किंवा पाण्याचा झरा, झोंपड्यांत एका अंगास शेळ्या वगैरे बांधण्याची व दुसऱ्या अंगास रांधावयाची जागा, मध्यभागीं परसा, एका कोंपऱ्यांत जातें व उखळ, दुसऱ्यांत कावडीं झांकण्याचें डालकें, तिसऱ्यांत कुदळी वगैरे शतीचीं विखणें व चौथ्यांत लांकूड कोरून त्यांत उंचजागीं अडकविलेले विळे, कोयते वगैरे सामग्री आहे. माळवच्यावर चारा व नागली वगैरे धान्याचा मुडा किंवा लहानसा कणगा ठेविला आहे. क्रूरपशूंपासून संरक्षण व उपजीविका करण्याचीं साधनें जीं गलूल व तीरकमटा तीं माळवच्यास खोंचून ठेविलीं आहेत. ह्मणण्याजोगा भांड्यांकुंड्यांचा पसाराही नाहीं. फार झालें तर, तवा, पितळेची लहानशी चरवी व असल्यास कांशाची ताटवाटी एवढींच काय तीं धातूचीं भांडा; बाकी परळ, माठ, डवली, घागरी, गाडगीं वगैरे मातीचीं भांडीं व सूप, टोपलें आणि दोर दोरखंडें. पुरुषांस पांघरावयास एखादी घोंगडी किंवा गांवठी भक्कम धोतर, नेसावयास लंगोटी व डोकीस गुंडाळावयाचें लहानसें पागोटें, बायकोस नेसावयास बांड व कथील, पितळ, कांसें या धातूंचे अल्प मोलाचे दागिने एवढीच काय ती जिंदगी दिसावयाची.

अशा प्रकारें भील, कोळी, ठाकूर, वारली या लोकांच्या रहणीचें हुबेहूब चित्र शके १४८० च्या सुमारास त्र्यंबकवाडी दाखवीत होती.

ह्याप्रमाणें जगांतील अरण्यवासाचा जरी ते लोक उपभोग घेऊन असत, तरी अंजनेरी येथील गौळी राजांचे हस्तक हे त्यांजवर अधिकार चालवीत.

" कोणत्याही भागावर एकाचीच सत्ता चिरस्थायी व्हावयाची नाहीं, " असें जें इतिहासावरून अनुभवसिद्ध प्रमाण निघतें, त्याप्रमाणें गौळी राजांचा ऱ्हास होऊन मुसलमानांचा उत्कर्ष झाला. मुसलमानांनीं जें राज्य स्थापिलें त्यास ब्राह्मणी अशी संज्ञा होती. तेंही सारें दीडशेंच वर्षं चालून त्याचे तुकडे तुकडे होऊन लयास गेलें. जे विभाग झाले, त्यांतील अहमदनगरचे राज्यास निजाम शाई ह्मणत. त्र्यंबकवाडी हें खेडें संगमनेर सुभ्यांत असून तो सुभा निजामशाहींत होता, ह्यामुळें येथें ही निजामशाहीचीसत्ता होती हें निराळें सांगावयास नको.

शत्रूस आपण अजिंक्य व्हावें अशा हेतूनें मनुष्यांनीं ज्या अनेक घातुक युक्ति योजिल्या आहेत, त्यापैकींच कितीएक साहसी लोकांनीं विकट डोंगरावर वसतिस्थान करून आपला बचाव केला, आणि शत्रूंस उपद्रव देण्याचा क्रम चालविला. त्यामुळें डोंगरी किल्ले पुष्कळ प्रसिद्धीस आले. त्यांतलाच त्र्यंबकचा किल्ला आहे.

ज्या काळचें हें वर्णन आहे त्या काळीं, हल्लींच्या रमणीय कुशावर्ताचे व त्र्यंबकेश्वराचे भव्य देवालयाचे जागीं जुनाट हेमाडपंती तळें व देऊळ होतें. आतांच्या

प्रमाणें निर्भयपणा व सोयी त्यावेळीं नसल्या कारणानें अंजनेरी येथून ब्राह्मण लोक यात्रेकऱ्यांचा समुदाय बरोबर घेऊन येत; आणि कुशावर्तांचें स्नान व देवार्चन करवून परत अंजनेरीस वस्तीस जात.

ह्या वेळीं त्र्यंबकवाडीची वस्ती वाढली व थोडा व्यापारधंदा सुरू झाला;नंतर शके १५००चे सुमारास याठिकाणीं ब्राह्मणांचींही पांच चार कुटुंबें राहण्यास आलीं.

शके १५५२ च्या सुमारास हिंदूचें नांव गाजविणारा मोहरा जो शिवाजी त्याच्या बापानें नासिक व त्यासभोंवतालचा मुलूख निजामशाही बुडण्याचे संधीस बळकाविला. या गोष्टीस सात आठ वर्षें पुरीं झालीं नाहींत, तोंच तो प्रांत शहाजहानानें घेतला. त्यांतच त्र्यंबक व चांदवड हे किल्ले त्यास मिळाले.

ह्या मोंगल घराण्यांतील हिंदुधर्मद्वेष्ट्या औरंगजेबाचे कारकीर्दींत हिंदूंचे देव व धर्म यांवर जो हल्ला झाला त्यांतच त्र्यंबकेश्वराचे लहानशा देवळाचा विध्वंस होऊन जवळच मशीद झाली.

मोंगलांचा किल्लेदार अबदुल्लाखान याचे कारकीर्दींत गांवांत पेंठा झाल्या त्या —

१ मेहालेगंज, २ नवापुरा, ३ पेंठमावल्या, ४ आ-

---

१ हीं नांवें अनुक्रमें, १ देवाची कोठी, २ देवळीकरांची होळी, ३ जोगळेकरांचें घर, ४ ढुगलांची आळी,५ लोहारआळी, ६ चालू बाजार, व ७ गंगालयाची उत्तरदिशा ह्या ठिकाणांस होतीं.

बाद ऊर्फ अबदुल्लपुरा, ५ गंभीरपुरा, ६ जुना बाजार, आणि ७ सोळपुरा.

निजामशाही बुडून एक शतक झाल्यानंतर क्षात्रधर्म स्वीकारून परशुरामाचें अनुकरण करणारा जो पहिला बाजीराव ह्यानें दिल्लीवर स्वारी करून बलहीन झालेल्या बादशहापासून छत्रपति शाहूकरितां सहा सुभ्यांची चौथाई व सरदेशमुखी या हक्कांची सनद मिळविली; ते वसूल करण्याकरितां जागजागीं जे अधिकारी नेमिले, त्यांत नारायण दामोदर जोगळेकर यांजकडे त्र्यंबक व त्याचे आसपासच्या प्रदेशांतील वसुलाचें काम होतें. बारा चौदा वर्षांतील अनुभवानें किल्ल्यावर मोंगलांचा ढिला बंदोबस्त आहे असें कळून येतांच त्यांनीं त्र्यंबक सूर्याजी परभू ह्याचे साह्यानें शके १६७३ त तो किल्ला पेशव्यांकरितां घेतला. ह्या बहादुरीबद्दल जोगळेकरांस तळेगांव, व त्र्यंबक सूर्याजींस परळी हीं गावें जहागीर मिळालीं. तीं अद्याप त्यांचे वंशांकडे चालत आहेत.

येथें पेशव्यांचा अंमल चालू झाल्यावर ह्या गांवाच्या भरभराटीस आरंभ झाला; ब्राह्मणांचीं तीस चाळीस असलेलीं घरें वाढत वाढत चारशें पर्यंत वाढलीं; व्यापारी व इतर धंद्याचे लोक घरंदाज झाले; अहिल्या नदीच्या पलीकडे दुधआवडीजवळ पेशव्यांचे बंधु राघोबादादा ह्यांनीं वाडा बांधिला, व तिकडे वस्ती वाढविण्याच्या इराद्यानें ब्राह्मणांस जागा दिल्या; परंतु पुढें आपसांतील कलह व राजकीय अडचणी ह्यांमुळें सर्व बेत मनांतल्या मनांत राहून त्र्यंबकचे भरभराटीची वाढ खुंटली.

शके १६७२ सालीं होळकर सरकारचे फडनवीस रावजी महादेव पारनेरकर ह्यांनीं कुशावर्त बांधण्याचे कामास आरंभ केला होता; त्याच संधीस नानासाहेब पेशव्यांची स्वारी तेथें आली, आणि कुशावर्त पाहून तें बांधावें असा विचार त्यांनीं मनांत आणिला. परंतु आरंभिलेलें कार्य आपलेच हातानें पूर्णतेस जावें, अशी महत्वाकांक्षा फडनवीस ह्यांस असल्या मुळें ते त्या गोष्टीस मान्य झाले नाहींत; ह्यास्तव पेशव्यांस राग येऊन उत्तरेस दुसरें कुशावर्त बांधण्याचा निश्चय केला; परंतु ब्रह्मवृंदांनीं असें न करण्याविषयीं प्रार्थना केल्यावरून त्यांनीं आपला आग्रह सोडिला. मग कुशावर्ताकरितां जी जागा घेतली होती तेथें रामलक्ष्मणांच्या मूर्ति स्थापन केल्या.

शके १६७७ त श्रीत्र्यंबकेश्वराचें देवालय बांधण्याची सुरवात झाली. साऱ्या हिंदुस्थान देशावर ज्याचा दरारा; व हिंदुपद बादशाहीचीं सूत्रें पूर्णपणें ज्याच्या हातांत अशा भाग्यशाली बाळाजी बाजीरावाच्या हातून आरंभ होऊन त्या पुरुषापासून तिसरे पिढीपर्यंतही देवळाचें काम पुरें झालें नाहीं, ही गोष्ट लक्षांत आणिली असतां एकाद्यास जें कार्य करतलामलक असतें, त्यासही कालावधि लागतो असें दिसून येतें.

जसें देवळाचें काम होण्यास ३१ वर्षें लागून तें शके १७०८ त पूर्ण झालें, तसें देवाचे अर्चसही दिनावधि लागून शके १७२८ त ती निर्विघ्नपणें तडीस गेली.

इमारतीचें काम पुरें झाल्यावर २० वर्षे पर्यंत हें काम मागें कां पडलें, अशी शंका वाचकांस आल्यावांचून राहणार नाहीं. कारण, पेशव्यांस अर्चा करण्यास प्रतिकूलता नव्हती, परंतु आपस्तंब व यजुर्वेदी यांत जो यज्ञ वगैरे प्रसंगीं दक्षिणद्वार आमचें. असा दुराग्रहाचा वाद होता, त्यामुळें कालातिक्रमण झालें. एकदां तर अर्चा करण्याची सर्व तयारी झाली असतां, यजुर्वेदी मंडळीकडून निकराचा त्रागा झाल्यामुळें बेत रहित करावा लागला. पुढें त्याच शाखेंतील वांईकर खंड भटजी दीक्षित ह्यांनीं निःपक्षपातानें आपले विरुद्ध शास्त्राधार दाखविल्यावर शेवटल्या बाजीरावानें आग्रही ब्राह्मणांस किल्ल्यावर अनुष्ठानांत गुंतवून अर्चेचें काम पुरें केलें.

पेशव्यांनीं देवास सोन्याचा मुखवटा करविला होता, जेव्हां यशवंतराव होळकर बाजीरावाचे मुलखांत लूट करीतकरीत त्र्यंबकेश्वरीं आले आणि त्यांनीं लुटीऐवजीं खंडणी मागितली, तेव्हां देवाचा मुखवटा नेणार नाहींत, असें समजून तुंगार ह्यांनीं तो पुढें ठेविला; परंतु त्यावरच डल्ला मारून यशवंतराव चालते झाले. पुढें बाजीरावानें तुंगारांचें उत्पन्न जप्त करून शके १७३८

---

१ देवाची पूजा प्रथम ठाकूर, नंतर आचारी कुळांतील कोळी व त्यांजकडून सावंत आडनांवाचे मराठे यांजकडे आली; सावंत वंशांत एक तुंगुनांवाचा पुजारी होऊन गेला, त्यावरून त्याचे वंशास तुंगार हें नांव पडलें.

त सोन्याचा पंचमुखी मुखवटा पुनः करविला; तोच अद्यापि कायम आहे.

जसें संपत्ति मिळविण्यापेक्षां ती रक्षण करणें कठीण, तसें राज्य मिळालें असतां तें सुरळीत चालविणें फार जोखमीचें आहे. राज्यसत्ता ज्या पुरुषावर अवलंबून असते, त्याच्या आंगीं एखादा दुर्गुण असला, तर तो राज्यांत अनेक बखेडे उपस्थित होण्यास कारण होतो. मग ज्याच्या आंगीं राज्योपयोगी अनेक गुणांचा अभाव अशा बाजीरावाचे हातीं संपूर्ण राज्य आल्यावर तें सुयंत्र चाललें नाहीं, यांत आश्चर्य तें कोणतें ? त्या वेळीं जी बलबलपुरी माजली, तिचा बंदोबस्त करण्याचा आवांका आंगीं नसल्यामुळें पूर्वजांनीं प्राणांकडेही न पाहतां संपादन केलेल्या दुर्मिळ राज्यावर एका क्षणांत पाणी सोडून इंग्रज सरकारांतून मिळणाऱ्या नक्त नेमणुकीवर स्वस्थ राहण्यास तो कबूल झाला. सर्व सत्ता हातीं येतांच तिच्या रक्षणाची दक्षता ठेवून जे किल्ले सामोपचारानें हातीं आले नाहींत, ते इंग्रजांनीं लढून घेतले. त्यांतच शके १७४१ त त्र्यंबकचा किल्ला रूपराम चौधरी व बापू गोखल्याचे लोक यांजपासून घेतला.

हा किल्ला ब्रह्मगिरि नामक डोंगरावर आहे. ह्या डोंगराचा बराच भाग चढून गेल्यावर सुमारें २०० हात उंचीचा सभोंवार तुटलेला पाषाणमय कडा आहे. ह्या कड्याच्या पायथ्याशीं किल्ल्यासभोंवतीं लहान लहान बारा वाड्या आहेत त्यांस मेटा असें ह्मणतात. किल्ल्यावर सामानसुमान व फौजफांटा जाण्याचा रस्ता किल्ल्याचे

पूर्वेस महादरवाज्यांतून आहे. या शिवाय गांवाकडून व पश्चिम आंगानें अशा दोन लहान वाटा आहेत; परंतु त्या वाटांनीं जाण्यास मनुष्यास अतिशय प्रयास पडतात. कडा चढून गेल्यावर पूर्वोत्तरभागीं गडकरी लोकांचीं घरें, सामानसुमानाचीं ठिकाणें, व इमारती यांच्या खुणा दृष्टीस पडतात. तेथून वर बरीच उंच टेंकडी असून तिजवर एक तलाव आहे. पलीकडे पश्चिम आंगच्या तुटलेल्या कड्याजवळ श्रीत्र्यंबकेश्वराचें देऊळ असून त्या पुढें त्र्यंबकतीर्थ आहे व त्याचे दक्षिण आंगास थोड्या अंतरावर औदुंबराचा एक जुनाट वृक्ष आहे. त्याचे खालीं एक लहानसें सुंदर कुंड असून त्यांत वृक्षमूलापासून गंगोदकाचा अखंड प्रवाह चालू आहे. देवळापासून उत्तरेकडे बरेंच लांब गेल्यावर कातळावर दिसणाऱ्या रेषांस शंकरानें जटा आपटल्याचें ठिकाण असें ह्मणतात. तेथून बराच भाग चालून गेल्यावर गंगाद्वाराचा माथा लागतो.

“ **नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण !** ”

ह्या वाक्याप्रमाणें त्र्यंबकचा किल्ला कालचक्राच्या फेऱ्यांत सांपडून हल्लीं फारच निकृष्टस्थितींत आला आहे. जे तट दुसऱ्याचें संरक्षण करण्यास समर्थ होते, त्यांसच स्वतःच्या रक्षणाचें त्राण राहिलें नाहीं. भयंकर गर्जना करून लोकांच्या कानटाळ्या बसविणाऱ्या व शेंकडों लोकांचीं शरीरें क्षणांत छिन्नभिन्न करणाऱ्या काली आदिकरून ज्या तोफा, त्या स्वतःच भग्न झाल्या आहेत. ज्या जागीं शूरांच्या गर्जना होत होत्या तेथें घुबडांचे शब्द ऐकूं

येतात; धान्यांच्या कोठारांत केरचे पुंज सांचले आहेत, दारूच्या कोठ्यांत गवताचे गंज भरले आहेत, सोन्यारुप्याच्या खजीन्याच्या जागीं दगडांचा ढीग; प्राणहारक शस्त्रांच्या ठिकाणीं कांटेरीं झाडें; याप्रमाणें अवदसेच्या फेऱ्यानें आपल्या पूर्वजांचे वैभवाची दैना केलेली पाहून कोणास वाईट वाटल्यावांचून राहील ? !!

---

## भाग २ रा.

### ( यात्रावर्णन )

श्लोक. ( शा. वृ. )

**क्षेत्रामाजि असे प्रसिद्ध ह्मणुनी यात्रार्थ येती**
**जन, भक्तीनें करितात तीर्थविधिला दे-**
**ती द्विजां भोजन ॥ सांबाला अभिषेक रुद्र**
**ह्मणुनी पंचामृतीं मज्जन, अर्पूनी, वसनादि**
**अर्घ्य समयीं ते सारिती पूजन ॥ १ ॥**

ह्या क्षेत्रांत यात्रेकरितां हिंदुस्थानच्या बहुतेक प्रांतांतले लोक येतात. आगगाडी झाल्यापासून यात्रेकरूंचें मान फार वाढलें आहे.

हल्लीं येणारे यात्रेकरू नासिक क्षेत्रावरून येतात. तेथून ह्या क्षेत्रापर्यंत सडक बांधिली आहे. त्या सडकेनें येतांना चौदावा मैल संपतो आहे, तोंच

डावीकडे अंजनीचा उंच डोंगर व त्यावरील अवघड किल्ल्याचा भयप्रद देखावा दृष्टोत्पत्तीस येऊन त्याचा चढाव कष्टप्रद भासतो. पुढें खिंडींत उजव्या बाजूस गणपतीचें लहानसें देऊळ आहे, ह्मणून तीस गणेशखिंड असें ह्मणतात. ही खिंड टाकून पुढें पिशाच ओहोळाच्या माथ्यावर गेलें ह्मणजे त्र्यंबकचे डोंगर स्पष्ट दिसूं लागतात. पुढें अर्धकोशावर प्रयागतीर्थाची झाडी दिसते, ती पाहून गैरमाहित मनुष्यास येथेंच गांव असावासें वाटतें. थोडीशी उत्तरेकडे दृष्टि फिरवितांच एका बऱ्याच उंच टेंकडीवर चार पांच झाडांचा हिरवा गार गुच्छ दृष्टीस पडतो. तोच नीलपर्वत होय.

कांहीं अंतरावर बाणगंगा नदी उतरून माथ्यावर जातांच सभोंवतीं गर्द छाया, मध्यभागीं ज्यास प्रयागतीर्थ ह्मणतात तो मोटा तलाव असून, दक्षिण बाजूस आखाडा ह्मणजे साधुसंतांकरितां इमारत आहे.

मनुष्य, पशु, पक्षी इत्यादिकांस विश्रांति देणारें व श्रमहारक असें हें रमणीय स्थान, पुण्यशील साध्वी अहल्याबाई होळकरीण हिनें बांधिलें आहे, असें जेव्हां शोध करणारास कळतें, तेव्हां तिजविषयीं पूज्यबुद्धीनें अंतःकरण उचंबळतें, व ज्या भरतभूमींत हें स्त्रीरत्न निपजलें, त्या भूमीविषयीं अभिमान उत्पन्न होतो.

रात्रीच्या वेळीं हळूहळू मार्गक्रमण करणाऱ्या बैलगाडींतून यात्रेकरू सत्रावे मैलाजवळ येतांच त्र्यंबकेश्वराचे देवालयाचे सुवर्णमय कळस, चौघड्याचा ध्वनि, वृक्षयु-

क्त अर्धचंद्राकृति डोंगर, व त्याचे पोटांत गांव हीं जेव्हां दृष्टीस पडतात, तेव्हां भगव्या झेंड्याच्या सहवासी मनुष्यास आपण अजीमताऱ्याजवळचे साताऱ्यांतच प्रवेश करितों कीं काय, असा भास होतो. किंचित् पुढें गेल्यावर गोदावरीचें संकोचित पात्र व शुष्कप्रवाह पाहून उल्हासवृत्तिही संकोच पावते. येथपासून श्रांत झालेला यात्रेकरू बिऱ्हार्डी ज्राईपर्यंत, वृत्तिवंत भिक्षुक, नांव, उपनांव व गांव हें विचारून विचारून अतिशयित कंटाळा आणितात; व शेवटीं ज्याजवळ पूर्वजांचे लेख निघतील तो त्याला आपले घरीं घेऊन जातो, व यात्रा पुरी झाल्यावर यात्रेकऱ्यापासून लेख लिहून घेतो.

(तेथें गेल्यावर यात्रेकऱ्याचीं कर्तव्यकर्मे येणेंप्रमाणें आहेत.

१ कुशावर्तावर तीर्थविधि.

२ श्रीत्र्यंबकेश्वराचें दर्शन, पूजन[1] व देवब्राह्मण.

३ पंचतीर्थीं[2] अगर अष्टतीर्थीं स्नान अथवा वंदन.)

---

१ येथें लघुरुद्र करितांना अकरा एकादशन्या करून शिवाय गंगा, मारुती, गणपति व दोन देवी यांना अनुक्रमें उपाध्याय, जोशी, देशमुख, कुळकर्णी व महाजन यांजकडूनच एक एक एकादशनी करविण्याचा प्रघात आहे. गांवांत वस्तीचे वेळीं हेच प्रथम येऊन राहिले; या मळें त्यांनीं बसविलेले हक्क पुष्कळ दिवस चालले आहेत.

२ गंगाद्वार, कुशावर्त, बिल्व, कनखल व नीलांबिका देवी अशीं पंचतीर्थें व राम, लक्ष्मण आणि कंचन हीं

४ ब्रह्मगिरीची लहान अथवा मोठी प्रदक्षिणा.

५ नागबलि व नारायणबलि.

६ देवस्थानें व तीर्थें पाहणें आणि ब्राह्मणांचा सत्कार करणें.

हे सर्वच प्रकार यात्रेकरू करितो असें नाहीं.

---

(तीन तीर्थें मिळून अष्टतीर्थें होत. पंचतीर्थें व अष्टतीर्थें करीत असतां नीलांबिका देवीचें दर्शन व बाकीच्या तीर्थी स्नान करीत असतात.)

१ लहान प्रदक्षिणेचे वेळीं प्रथम कुशावर्तावर स्नानकरून पुढें त्र्यंबकेश्वराचें दर्शन घ्यावें लागतें; आणि तसेंच उत्तरद्वारानें प्रयागतीर्थ, सरस्वतीबारी, रामतीर्थ, बाणगंगा, निर्मलतीर्थ; वैतरणा, गौतमाची खिंड, पश्चिमवाहिनी व धवलगंगा, शाली, पद्म, भुजंग, व नृसिंह हीं तीर्थें, व पुढें गणेशखिंड, बिल्वतीर्थ, नीलांबिका आणि मुकुंदतीर्थ यांवरून पुनः त्र्यंबकेश्वर व कुशावर्त येथें यावें लागतें

२ मोठ्या प्रदक्षिणेंत प्रारंभापासून वैतरणेपर्यंत पूर्वोक्त क्रमानें जाऊन पुढें झारवाड, ब्रह्मकमंडलुतीर्थ, सातमाळ, हरिहराचा डोंगर व तीर्थ, लेंकुरवाळी देवी यांवरून किंवा उतरून नृसिंहतीर्थाजवळ आल्यावर प्रथम प्रदक्षिणेच्या मार्गास लागावें लागतें.

३ कोणास भूतबाधा, कोणास गोत्रपुरूषाची पीडा किंवा कोणास संतति होत नसेल, तर हा विधि करिता-

# भाग ३ रा.

## सांप्रतची स्थिति.

### आर्या.

श्रीमत् त्र्यंबकमंदिर, वृत्त कुशावर्त भा-
ग तिसरा वी ॥ दावी ही स्थिति सांप्रत,
संक्षेपें ती कधीं न विसरावी ॥ १ ॥

ह्या ठिकाणीं तीर्थें व देवालयें बहुत आहेत; परंतु त्यांत कुशावर्त तीर्थ व श्रीत्र्यंबकेश्वराचें देऊळ हीं सर्वांत श्रेष्ठ असून त्यांची बांधणी मजबूत, सुबक, मनोहर आणि कारागिरीनें परिपूर्ण असल्यामुळें त्यांचें

---

त. सुमुहूर्तीं आरंभ करून प्रथमदिवशीं नागाचा पुतळा करून त्याचे मनुष्याच्या प्रेताप्रमाणें दहनक्रिया वगैरे संस्कार करितात; त्याचें एक दिवस अशौच धरून दुसरे दिवशीं त्याची समाप्ति होते. नंतर नारायणबलीस प्रारंभ करून त्याचा वरील प्रमाणेंच विधि करितात. नंतर तिसऱ्या दिवशीं या संबंधानें पुण्याहवाचन व ब्राह्मणभोजन करितात. मनुष्याच्या उत्तरक्रियेस भोजनास जाण्यास ज्याप्रमाणें अनमान करितात, त्याप्रमाणें न करितां सर्व विद्वान् सुद्धां या प्रसंगीं भोजनास जातात.

मात्र साग्र वर्णन करून बाकीचीं तीर्थें व देवालयें यांची संक्षिप्त माहिती या पुस्तकाच्या शेवटीं दिली आहे.

## कुशावर्त तीर्थ.

मंदाक्रांतावृत्त.

**केलें मर्यादित निजकुशें गौतमानें स्वयें जें,**
**ज्याचे ठायीं प्रमुदित मनें नित्य गंगा वि-**
**राजे ॥ ज्याच्या स्नानें सुगति वरण्या होय**
**पापी समर्थ, तीर्थांमाजी परम विलसे तें**
**कुशावर्त तीर्थ ॥ १ ॥**

कुश ह्मणजे दर्भ आणि आवर्त ह्मणजे मर्यादित. दर्भानें मर्यादित केलेले जागेंत गंगेनें रहावें, असें गौतम ऋषींनीं आपले सामर्थ्यानें केलें; ह्मणून त्यास कुशावर्त असें पुराणप्रसिद्ध नांव आहे.

कदाचित् हेमाडपंतानें हें तीर्थ बांधण्यापूर्वीं ह्या सभोंवतीं कुशांचीं पुष्कळ बेटें असतील,त्यावरूनही हें नांव पडण्याचा संभव आहे.

हें तीर्थ वस्तीचे मध्यभागीं आहे. हें बांधण्यास आरंभ शके १६७२ त होऊन पूर्णता शके १६९० त झाली. ह्याची बांधणी फार्च सुरेख आहे. पांचपुरूष खोलीवर लहानसें चौकोनी कुंड असून वर रुंद रुंद बांधीत नेलें आहे. कांहीं पायऱ्या बांधल्यावर मध्यें पटांगण, पुनः पायऱ्या, आणि पुनः पटांगण अशीं दोन पटांगणें गर्भीं

असून, तिसरें पटांगण शेवटचें आहे. प्रथम चौकोनी आकार असून शेवटल्या थरास पूर्वेकडील भाग सातफूट कमी करून षट्कोण केले आहेत वरील सपाटीची लांबी पूर्व पश्चिम ८१ फुट व रुंदी दक्षिणोत्तर ७४ फुट आहे. षट्कोणाची बाजू ७ फूट सोडिली, तर बाकी चौरस राहते. बांधणीचे दगड पक्के असून चांगले घडींव व कमावलेले आहेत, आणि पाणी सर्वबाजूंस सारखें राहील असें केलें आहे.

कुशावर्ता सभोंवतीं उत्तर, पश्चिम आणि दक्षिण अशा तीन बाजूंस, सुमारें चार फुट उंचीच्या जोत्यावर ओऱ्या बांधिल्या आहेत. त्यांचें कामही फारच नक्षीदार आहे. पश्चिम बाजूस १३ व दक्षिणोत्तर बाजूंस ११, ११ खण आहेत. ईशान्य, वायव्य, नैर्ऋत्य व आग्नेयी ह्या चार कोंपऱ्यांवर चार देवळें बांधिलीं असून, आग्नेयी कोंपऱ्याचे देवळाजवळ केदारेश्वराचें देवालय आहे. ह्या सर्व देवालयांचे बांधणीचा घाट श्रीत्र्यंबकेश्वराचे देवळाप्रमाणेंच आहे. यांत नैर्ऋत्य कोंपऱ्यास गणपति, वायव्येस महादेव, व पश्चिमभागीं गौतमाची मूर्ति असून, दुसऱ्याही अनेक मूर्ति आहेत. ओऱ्यांच्या नैर्ऋत्य कोंपऱ्यांत शेषशायीची सुरेख मूर्ति पाहण्याजोगी आहे. तिच्या खालून गंगेचा ओघ तीर्थांत येतो. तशीच एक नृसिंहाची सुंदर मूर्ति आहे. ओऱ्यांच्या जमिनीला घोटींव पाषाणाची फरसबंदी आहे. पश्चिमेकडील व दक्षिणेकडील ओऱ्यांतून बाहेर जाण्यास

---

१ चोवीस पृष्ठांतील टीप पहा.

दरवाजे आहेत. पूर्वेकडील भाग खुला असून तो पायऱ्या बांधीत बांधीत ओऱ्यांच्या जोत्यापेक्षां उंच केला आहे. पलीकडे कंचन, व कनखल हीं तीर्थें आणि ज्वरेश्वर व कंचनेश्वर ह्यांचीं देवळें आहेत.

सकाळच्या प्रहरीं ह्या ठिकाणीं फारच बहार दिसते. प्रत्यहीं स्नानाकरितां मनुष्यांची मोठी गर्दी असते. त्यांत कितीएक लगबगीनें स्नानें करून तीर्थास सव्य घेऊन जात असतात. ब्राह्मणसमुदायांत कांहींचीं स्नानें झालीं आहेत, व कांहीं करीत आहेत; किती एकांनीं भस्मलेपन केलें आहे, व किती एक त्रिपुंड्र धारण करीत आहेत; कोणी शाली, कोणी बनाती व कोणी धाबळ्या पांघरून संध्यादिविधि आटोपून देवदर्शनाकरितां जात आहेत; कांहींनीं गोमुखींत हात घालून जपसमयीं दृष्टि नासाग्रीं लाविली आहे, व कितीएक नाकावर हात ठेवून प्राणायाम करीत आहेत. असा थाट इकडे चालला असतां, दुसऱ्या बाजूस वेणीफणी करून शुचिर्भूत झालेल्या सुवासिनींचे समुदायांत कितीएक स्त्रिया सौभाग्यदर्शक केशकलापांत गंगोदकाचा प्रवेश होईल, ह्या भीतीनें मोठ्या बेतानें गळ्याखालून स्नानें करीत आहेत, व कांहीं स्नान केल्यावर गंगोदकानें आर्द्र असलेले हात डोकीवरून फिरवून कोरडें वस्त्र नेसण्याकरितां थबथबत केदारेश्वराचे देवळांत जात आहेत. धुतवस्त्रें परिधान केलेल्या कितीएक स्त्रिया गौतमीचें हरिद्राकुंकुमादि द्रव्यांनीं पूजन करून “ हे त्रिजगत्पावनि गोदे, जसें तूं शिवप्राप्ति करून घेऊन अखंड सौभाग्य धारण केलेंस, तद्वत् तुझ्या कृपेनें आह्मांसही शिवाची ( क-

ल्याणाची) प्राप्ति होवो." असा मनोभाव दार्शित करीत आहेत; कितीएक आपल्या मैत्रिणींस हरिद्राकुंकुम देऊन आपल्या घरोघर जात आहेत, कितीएकींचे ताम्रकुंभ उदकानें पूरित होत असतां, ज्या स्थानास आपण कांहींवेळ अंतरलों, अशा ठिकाणीं स्थित होण्याचा समय जवळ आला आहे, असें जाणूनच कीं काय ते आनंदानें गुडगुड असा ध्वनि करीत आहेत.

कांहीं ठिकाणीं नवीन आलेल्या यजमानांस त्यांचे तीर्थोपाध्याय तीर्थावर स्नानास आणीत आहेत; कितीएक स्नानसंकल्प सांगण्याचे वेळीं "हातांत पाणी घ्या" "आचमन करा," "नमस्कार करा" "गंगागंगेति यो ब्रूयात्" इत्यादि शब्दोच्चार मोठ्यानें करून संकल्प सांगत आहेत,व दक्षिणा घेण्याकरितां हात पुढें पसरीत आहेत, अशी एकच धूम जेमतेम बारा वाजेपर्यंत असते.

हा सर्व देखावा पाहून भाविक हिंदूंच्या अंतःकरणांत परलोक साधन करण्याजोगें हें स्थळ आहे, असा भाव उत्पन्न होतो.

याशिवाय प्रतिसोमवारीं श्रीत्र्यंबकेश्वराची स्वारी पालखींत बसून स्नानास ह्या ठिकाणीं थाटानें येते. त्यासमयीं यात्रेकरी व गांवचे लोक जमा होऊन कोणी तीर्थासभोंवतीं, कोणी ओऱ्यांत व कोणी ओऱ्यांचे कांठांवर बसतात. देवाच्या स्नानाचा थाट व बेतबात वर्णनीय असतो. स्नान व आरती होते तेव्हां सर्व लोक वस्त्रानें पालवणें व हातांनीं टाळ्या वाजविणें हीं आनंददर्शक कृत्यें करितात; त्यावेळीं

गंगा[illegible]ांत त्यांचा जो प्रतिबिंबित देखावा दिसतो, तो चित्ताची उदासीनता क्षणभर दूर करणारा असतो.

संध्याकाळीं घांटावर दीपावली लागली असतां, तिचाही प्रतिबिंबित देखावा असाच मनोहर असतो.

## श्रीत्र्यंबकेश्वराचें देवालय.

शिखरिणी वृत्त.

जा[illegible] कार्मी रे हर्षे साचें मन शिखर ज्याचें बघुनि रे,
पापश्रेणी मनिं शिवशिराणी तरतरे ॥
[illegible]ा शोभे कळस बहु त्या नेत्र रमती,
शिवस्थाना ऐशा बघुनि लव होते स्थिर मती॥१॥

नासिकाहून येतांना गांवच्या प्रारंभींच ही भव्य, नक्षीदार व उंच इमारत दिसते. ह्या देवालयासभोंवतीं दीड दोन पुरुष उंचीचा, चांगला घडींव व पक्या चिऱ्यांचा एक चौकोनी मजबूत कोट बांधिला आहे. ह्या कोटाच्या भिंतीची रुंदी ४। फूट असून दक्षिणोत्तर रुंदी २१८ फूट व पूर्वपश्चिम लांबी २६५ फूट आहे. कोटापासून दक्षिण बाजूस ९२, पूर्वेस ७७, उत्तरेस ७५ व पश्चिमेस ९१ फूट अंतर सोडून ह्या देवालयाचें काम केलें आहे. कोटास चार दिशांस चार दरवाजे आहेत. दक्षिण व पश्चिम दरवाजे लहान व पूर्वोत्तर दरवाजे मोठे आहेत. महादरवाजा पूर्वेस असावा, परंतु तिकडे वस्तीचा वापर कमी व देवाचे बागेंत जागेची अडचण हीं कारणें मनांत आणून उत्तरेचा म[illegible]तरा-

ल्याणाची) प्राप्ति होवो." असा मनोभाव दर्शित करीत आहेत; कितीएक आपल्या मैत्रिणींस हरिद्राकुंकुम देऊन आपल्या घरोघर जात आहेत, कितीएकींचे ताम्रकुंभ उदकानें पूरित होत असतां, ज्या स्थानास आपण कांहींवेळ अंतरलों, अशा ठिकाणीं स्थित होण्याचा समय जवळ आला आहे, असें जाणूनच कीं काय ते आनंदानें गुडगुड असा ध्वनि करीत आहेत.

कांहीं ठिकाणीं नवीन आलेल्या यजमानांस त्यांचे तीर्थोपाध्याय तीर्थावर स्नानास आणीत आहेत; कितीएक स्नानसंकल्प सांगण्याचे वेळीं "हातांत पाणी घ्या" "आचमन करा," "नमस्कार करा" "गंगागंगेति यो ब्रूयात्" इत्यादि शब्दोच्चार मोठ्यानें करून संकल्प सांगत आहेत,व दक्षिणा घेण्याकरितां हात पुढें पसरीत आहेत, अशी एकच धूम जेमतेम बारा वाजेपर्यंत असते.

हा सर्व देखावा पाहून भाविक हिंदूच्या अंतःकरणांत परलोक साधन करण्याजोगें हें स्थळ आहे, असा भाव उत्पन्न होतो.

याशिवाय प्रतिसोमवारीं श्रीत्र्यंबकेश्वराची स्वारी पालखींत बसून स्नानास ह्या ठिकाणीं थाटानें येते. त्यासमयीं यात्रेकरी व गांवचे लोक जमा होऊन कोणी तीर्थासभोंवतीं, कोणी ओऱ्यांत व कोणी ओऱ्यांचे कांठांवर बसतात. देवाच्या स्नानाचा थाट व बेतबात वर्णनीय असतो. स्नान व आरती होते तेव्हां सर्व लोक वस्त्रानें पालवणें व हातांनीं टाळ्या वाजविणें हीं आनंददर्शक कृत्यें करितात; त्यावेळीं

गंगा उ'गांत त्यांचा जो प्रतिबिंबित देखावा दिसतो, तो चित्ताची उदासीनता क्षणभर दूर करणारा असतो.

संध्याकाळीं घांटावर दीपावली लागली असतां, तिचा-ही प्रतिबिंबित देखावा असाच मनोहर असतो.

## श्रीत्र्यंबकेश्वराचें देवालय.

शिखरिणी वृत्त.

**भरे हर्षें साचें मन शिखर ज्याचें बघुनि रे,**
**विरे पापश्रेणी मनिं शिवशिराणी तरतरे ॥**
**सुवर्णाचा शोभे कळस बहु या नेत्र रमती,**
**शिवस्थाना ऐशा बघुनि लव होते स्थिर मती॥१॥**

नासिकाहून येतांना गांवच्या प्रारंभींच ही भव्य, नक्षीदार व उंच इमारत दिसते. ह्या देवालयासभोंवतीं दीड दोन पुरुष उंचीचा, चांगला घडींव व पक्या चिऱ्यांचा एक चौकोनी मजबूत कोट बांधिला आहे. ह्या कोटाच्या भिंतीची रुंदी ४। फूट असून दक्षिणोत्तर रुंदी २१८ फूट व पूर्वपश्चिम लांबी २६५ फूट आहे. कोटापासून दक्षिण बाजूस ९२, पूर्वेस ७७, उत्तरेस ७५ व पश्चिमेस ९१ फूट अंतर सोडून ह्या देवालयाचें काम केलें आहे. कोटास चार दिशांस चार दरवाजे आहेत. दक्षिण व पश्चिम दरवाजे लहान व पूर्वोत्तर दरवाजे मोठे आहेत. महादरवाजा पूर्वेस असावा, परंतु तिकडे वस्तीचा वापर कमी व देवाचे बागेंतील जागेची अडचण हीं कारणें मनांत आणून उत्तरेचा महातरा-

वाजा ठरविला आहे. पूर्वेकडील दरवाजावर घड्याळघरा पूर्वपश्चिमरुंदी फूट १९ व दक्षिणोत्तर लांबी फूट २४ चा आहे. उत्तरेकडील दरवाजावर नगारखाना दक्षिणोत्तर रुंदी १९ फूट व पूर्वपश्चिम लांबी ३८॥ फूटांचा असून त्याजवर चौघडा चालू आहे.

पश्चिम बाजूचे कोटापलीकडे संस्थानची कोठी आहे. तींत देवाची सर्व चीजवस्त राहून त्रिकाळ नैवेद्य व संस्थानचे आश्रितांचें दुवक्त जेवणखाण होतें.

दक्षिण दरवाजाचे पूर्व अंगास आंतील बाजूनें कोटास लागून एकाशीं एक अशीं सुमारें ३० लहान लहान देवालयें आहेत. तसेंच उत्तर दरवाजाचे पूर्वबाजूस कोटाचे बाहेरील अंगास देवाचा रथ ठेवण्यासाठीं एक इमारत आहे.

देवळासभोंवतालचें पटांगण चिरेबंदी आहे, व त्या पटांगणाचे प्रत्येक दगडावर निरानिराळी खूण आहे; ती प्रत्येक कारागिरानें किती काम केलें हें दाखविणारी असावी.

नैर्ऋत्य कोनास अमृतकुंड आहे, तें पूर्वी स्वयंभु लहानसें तळें होतें. त्या ठिकाणीं देवालयाचें काम संपल्यावर कारभाऱ्यांनीं पेशव्यांची परवानगी घेऊन शके १७१० चे सुमारास हें कुंड तळापासून बांधण्यास आरंभ करून एक दोन वर्षांत काम पुरें केलें. ह्याची रुंदी पूर्वपश्चिम ९० फूट व लांबी दक्षिणोत्तर ६० फूट असून, तें पुष्कळ खोल आहे. ह्याची बांधणी टिकाऊ असून आंत उतरण्यास चार जागीं दगडी पायऱ्या व त्या पुढें विश्रांतीच्या जागा आहेत. ह्याच तीर्थाचें पाणी देवाकडे उपसाऱ्यास पडतें.

१८०७
( २ )

पटांगणाचे मध्यभागीं मेरुप्रासादाकार पायऱ्यासुद्धां १८५ हात लपेटीचें व पांच दालनी असें पूर्वाभिमुख बांधिलेलें देवालय आहे. ह्यापैकीं तीन दालनें लहान असून तीं पूर्व, उत्तर व दक्षिण या आंगांस सभामंडपाचे दरवाजाबाहेर आहेत. त्यांची लांबीरुंदी औरसचौरस सात हात असून, तीं पटांगणापासून सात पायऱ्या चढल्यावर लागतात. दर्शन करून आल्यावर ह्यापैकीं एखाद्या दालनांत थोडा वेळ मनुष्य विश्रांतिकरितां बसतें, व सभोंवारचा मनोहर देखावा पाहून त्याच्या मनांतील इतर व्याप नाहींसे होऊन मन रमतें.

ह्या वर सांगितलेल्या तिन्ही दालनांतून आंत गेलें ह्मणजे सभामंडप पूर्वपश्चिम लांबी फूट ४० व दक्षिणोत्तर रुंदी फूट ४० चा घोटींव व गुळगुळीत दगडी फरसबंदी-चा आहे. सभामंडपांत मध्यभागीं संगमरवरी १२॥ फुटी-च्या चौरस चौऱ्यावर त्याच दगडाचें कांसव आहे. हा सभामंडप घुमटाचे आकाराचा बांधीत नेऊन कांसवाचे माथ्यावर कळस आहे. सभामंडपांत चोहोंकडे भिंतींस कोनाडे करून त्यांत चांगल्या सुबक, पाहण्याजोग्या अष्टभैरवादिकांच्या अनेक मूर्ति बसविल्या आहेत.

सभामंडपाचे पश्चिम दरवाज्यांतून तीन हात खोलीवर देवळाचा मुख्य गाभारा आहे. गाभाऱ्यांत मध्यभागीं शाळुंका आहे. इतर ठिकाणीं शाळुंकेंत जसें मध्यें उंच लिंग बसविलेलें असतें, तसें ह्याठिकाणीं नसून शाळुंकेंत कळशीभर पाणी राहण्याजोगा खळगा आहे. त्यांत अंतरा-

अंतरानें पोफळा एवढालीं ब्रह्माविष्णुमहेशात्मक तीन लिंगें आहेत.

गाभाऱ्यांत नंदादीपाशिवाय फारसा उजेड नाहीं. शाळुंकेभोंवतीं आठ दहा असामी बसण्याजोगी जागा आहे. नैर्ऋत्यकोपऱ्यांत भिंतींतच हौद केला आहे. अमृतकुंडाचें पाणी बाहेरून घालावें ह्मणजे तें हौदांत येतें, व तेथून गाभाऱ्यांतील कामास उपयोगीं पडतें. ह्या गाभाऱ्यांत तुंगार, गोसांवी आणि सोंवळे असलेले ब्राह्मण एवढेच लोक जातात. स्त्रिया व इतर पुरुष दरवाजाबाहेरून दर्शन घेतात.

देवळाचा जो भाग सर्वांत उंच बांधिलेला दिसतो, तो ह्याच गाभाऱ्यावरचा असून त्यावर नक्षीकामाची फारच दाटी झालेली आहे. हा भाग उतरंडीच्या आकाराचा बांधीत नेला असून त्याची कळसापर्यंत उंची ९५ फुट आहे.

---

१ हीं लिंगें गंगोदकानें सर्वकाळ आर्द्र असतात; तेणेंकरून त्या खळग्यांत प्रहरादीडप्रहरांत सुमारें अर्ध तांब्या पाणी सांचतें.

२ हा कळस व त्याचे खालोखाल ( सभामंडपावर एक व तीन दालनांवर तीन असे ) चार, मिळून पांच कळस असून नंदीचे देवळास एक, कुशावर्तावरील चारी कोपऱ्यांस चार, केदारेश्वरावर ( देवळावर एक व नंदीवर एक असे ) दोन, तसेच ज्वरेश्वरावर ( देवळावर एक व नंदीवर एक मिळून ) दोन, असे एकंदर १४ कळस पाषाणाचे

त्यास लागूनच ठेंगणा, चौपाखी, बदलल घाटाचा, परंपरेनें चिऱ्यांची जुळणी करून सभामंडप बांधिलेला आहे.

देवळावर सिंह, हत्ती, द्वारपाल, दिग्पाल, व देवगण ह्यांचीं चित्रें जेथल्या तेथें बसविलीं आहेत. त्यांत कांहीं साध्या व कांहीं संगमरवरी दगडाचीं आहेत. तीं चित्रें आपल्या कर्त्यांचें कुशलत्व दाखवीत असतां, लोक आपल्याकडे लक्ष्य देत नाहींत ह्मणूनच कीं काय खिन्न व उदासवाणीं झालीं आहेत, अशीं दिसतात. ह्या देवालयाची बांधणी फार मजबूत, अत्यंत मनोहर व शिल्पशास्त्राचे नियमाप्रमाणें प्राची प्रतीची साधून बांधिली आहे.

ह्या देवालयाचे पूर्वेस तीन चार हातांवर १४ हातांच्या चौरस चौत्र्यावर ११ हात लांबी रुंदीचें लहानसें देवालय आहे. त्यांत संगमरवरी दगडाचा खोदींव व अलंकार भूषणांनीं युक्त असा सुरेख नंदी आहे. या देवळास दक्षिणोत्तर भिंतीस दगडी जाळ्या व पूर्वपश्चिम सहा सहा पायऱ्या चढल्यावर लोखंडी गज बसविलेल्या चौकटी आहेत. त्यांतून नंदी चांगला दिसतो.

उत्तम ग्रंथकर्त्यानें मोठ्या चतुराईनें एखाद्या इमारतीचें लिहिलेलें वर्णन वाचून मनास जो आनंद होतो तो, प्रत्यक्ष ती इमारत पाहून होणाऱ्या आनंदापेक्षां फारच

---

आहेत; ते हल्लीं श्रीमंत रा. रा. अण्णासाहेब विंचूरकर ह्यांनीं सुवर्णाच्या पत्र्यांनीं मढविले आहेत. श्रीत्र्यंबकेश्वराचे देवळावर जो रूप्याचा त्रिशुळासह वृषभध्वज आहे, तोही त्यांनींच करून लाविला आहे.

कमी असतो. आणि प्रस्तुत वर्णनकर्ते तर त्या कामात अनभ्यासी असल्यामुळें वर्णन चटकदार होणार नाहीं. याकरितां अशीं स्थळें होईल तितकें करून प्रत्येक मनुष्यानें पहात जावीं.

ही इमारत पक्क्या दगडांनीं बांधिली आहे; परंतु अतिशय बरसातीमुळें ह्या इमारतीचें दगडी काम कित्येक ठिकाणीं पडलें आहे.

यारी वगैरे यंत्रें प्रचारांत नव्हतीं त्या काळीं अशीं अवाढव्य उंचीचीं कामें झालेलीं पाहून आश्चर्य वाटतें; परंतु झालेलें काम जमिनींत बुजवून टाकावें आणि त्यावर नवीन काम चालवावें, असा क्रम शेवटपर्यंत चाले; व सर्व काम पुरें झाल्यावर टाकिलेली भर काढीत असत. ह्याच रीतीनें ह्या देवालयाचें काम तयार झाल्याचें पुष्कळ लोक सांगतात.

आमच्या पूर्वजांत शिल्पशास्त्राची पूर्ण वाकबगारी होती, असें दाखविणाऱ्या इमारती आर्यभूमींत जागोजाग आहेत, त्यांपैकींच ही एक आहे. हिचें काम पाहून परदेशस्थ लोकही तारीफ केल्यावांचून रहात नाहींत.

**देवाचा लवाजमा**—राजाचे येथील व्यवस्थेंत एखादेवेळीं बदल होईल; परंतु ह्या देवस्थानचे बेतबातांत

---

१ जो दगड पुष्कळ तापविला असतां, पहिल्या प्रमाणेंच कायम रहातो, फुटत नाहीं, किंवा दुसरा कोणताही कमीपणा होत नाहीं, त्यास पक्का दगड ह्मणतात. अशाच दगडांचे चिरे मोठमोठ्या इमारतींस लावण्याचा प्रचार असे.

कधींही कमतरता यावयाची नाहीं. कांहीं दिवस या सं-
स्थानास लागणारा खर्च कच्चा मिळत असे, कांहीं दिवस गांव तोडून दिले होते, व पुढें नक्त पैसा मिळूं लागला. पूर्वीं चांदवडी हजार रुपये दरमाहा होते, त्या चांदवडी रुपयांस शेंकडा ४॥ रुपये प्रमाणें बट्टा रुपये ४५ वजा होऊन ९५५ रुपये दरमाहा कंपनी शिक्का इंग्रजसरकारांतून मिळत आहेत. बाजीरावाच्या देणग्या बहुतेक बंद केल्या; परंतु ही देणगी निरंतर चालवावी असें बाजीरावानें राज्य सोडितेवेळीं सांगितलें होतें, ह्मणून कायम राहिली. तिचा खर्च देवस्थानाकडे कशा रीतीनें व्हावा ह्याबद्दल पेशव्यांनीं नियम ठरवून दिले आहेत.

**लवाजमा**—२पालख्या, १ मुकुट, १ रथ, मौल्यवान् दागिने, १ छत्र, २ चामरें, २ चंदनीचवऱ्या. ४ मोरचेलें, २ अबदागिरी,उंची वस्त्रें व त्रिकाल झडणारा चौघडा.

---

१ हा रत्नजडित मौल्यवान् मुकुट पूर्वीं ह्मैसूरच्या राजाजवळ असून तेथून मोंगलांनीं दिल्लीस नेला, व पुढें भाऊसाहेब पेशवे ह्यांनीं पुण्यास आणिल्यावर देवास दिला.

२ श्रीमंत रघुनाथराव विठ्ठल दाणी विंचूर संस्थानचे मालक यांनीं श्रीत्र्यंबकेश्वराकरितां सुमारें १२ हजार रुपये खर्च करून हा अत्युत्कृष्ट रथ तयार करविला, आणि तो शके १७८७ कार्तिक शुद्ध ७ रोजीं देवास अर्पण केला. याच खर्चांत रथ ठेवण्यासाठीं त्यांनीं एक इमारत बांधिली आहे, व रथोत्साहासाठीं त्यांनीं दरसाल तीनशें रुपयांची कायम नेमणूक करून दिली आहे, तींतून कार्तिकमासीं उत्साह होतो.

## संस्थानचे व्यवस्थे साठीं नोकर.

३ त्रिकाळचे पुजारी, २ रोज ब्रह्मगिरीची प्रदक्षिणा करणारे, १ कायमचा व १ फिरता, १ दर सोमवारीं अभिषेक करणारा, १ देवापुढें पुराण सांगणारा पुराणिक, १ हरिदास ( कीर्तन करणारा व रोज आरती करणारा ), १ अवांतर सर्व देवांचे पूजेकरितां फिरता ब्राह्मण, १ गंगेस रोज एकादशनी करणारा, १ गवई, १ संस्थानचा कारभारी, ६ शागीर्द ( शिष्य ), २ आचारी, २ कारकून, १ कोठवळा, १६ शिबंदी ( १ सरदार व त्याचे हाताखालीं १ पोरगा, १ सबनीस, १३ शिपाई ), ४ भोई पालखीकडे, १ अबदागीरवाला, १ मशालजी, १ बेल आणण्याकडे गुरव १ चोपदार, १ जंगम शंख वाजविणारा, ३ घड्याळजी, १ गोलंदाज, १३ नगारखान्याकडे ( ४ वाजंत्री ह्मणजे सनई वाले, २ सूरकरी, २ कर्णेकरी, २ नगारजी, १ दमामी ह्मणजे मोठा नगारा वाजविणारा, १ झांझी, १ वारीदार ह्मणजे हरकामी ), २ माळी बागेकडे, १ कामाठीण, व १ श्रीत्र्यंबकेश्वराचे देवाल्यापासून कुशावर्तापर्यंत रस्ता झाडून साफ करणारा.

देवाची त्रिकाळ पूजा व नैवेद्य आणि आश्रितांचें दुवक्त जेवण वगैरे सर्व कामें व्यवस्थित रीतीनें वेळचे वेळीं होत आहेत किंवा नाहींत, यांजवर नजर कारभारी यांनीं ठेविली पाहिजे.

संस्थानचे व्यवस्थेसाठीं पेशव्यांनीं नियम करून दिले आहेत, त्यांस बेहडा असें ह्मणतात. त्यांत कोणी काय

काय काम करावें व त्यास तनखा किती किती मिळावा हें सर्व नमूद केलें आहे. तसेंच देवाचे उपभोगाकडे व नित्य, नैमित्तिक व उत्साह यांत लागणारे प्रत्येक जिनसा-चा सर्व वर्षाचा अंदाज धरून जिन्नसझाडा दर्शविला आ-हे. हा बेहडा फारच विचार करून तयार केला आहे असें दिसतें. कारण ज्या ज्या वेळीं जो जो पदार्थ जितका लागावयाचा, तो तो बेगमीपुरता नमूद झालेलाच आहे. कोणत्याही प्रकारची उणीव त्या बेहड्यांत दिसून येत ना-हीं, तरी त्यांत एक मोठाच उणेपणा राहिला आहे, तो हा कीं, वट्टा वजा जातां देवाचे साडे अकराहजार रुपये उत्पन्नापैकीं पांच हजार रुपये मुशाहिरा, व साडेसहा ह-जार रुपये दास्तानखर्च होत आहे. देवाच्या प्रचंड इमा-रतीच्या दुरुस्तीकडे रक्कम खर्च करण्यास मुळींच सवड नाहीं व याच मुळें झालेली पडझड दुरुस्त होण्यास मार्ग नाहीं. पेशव्यांकडून देवस्थानाची जी व्यवस्था लागून चुकली आहे, तींत असलेला उणेपणा वर दर्शविला आहे. तो हल्लींचे काळीं जरी दोषार्ह दिसतो, तरी ज्या काळीं पे-शवे करितील ती पूर्वदिशा होत असे, त्या काळीं आपण बांधिलेल्या देवळाच्या दुरुस्तीची पुढें अडचण पडेल, हें त्यांचे स्वप्नींही येण्याचा संभव नव्हता.

असो, हल्लीं ह्या देशांत पेशव्यांच्याच आश्रयानें उद-यास आलेले व त्यांजविषयीं पूज्यबुद्धि बाळगणारे संस्था-निकांनीं दुरुस्तीकरितां कांहीं वर्षासन करून दिल्या-शिवाय ही देवळाची इमारत जशीच्या तशी टिकण्यास दुसरा मार्ग नाहीं.

**देवाचे उपचार**—देवाचे मुखवटे दोन आहेत; एक सोन्याचा असून पंचमुखी, व दुसरा रूप्याचा आहे, त्यास भोग विलासादि उपचार होतात.

सकाळची दुपारची. षोडशोपचार पूजा, व तिसरे प्रहरीं पुष्पपूजा होते. घटिका रात्रीचे सुमारास प्रदोष-पूजेस आरंभ होऊन आरती, मंत्रपुष्प वगैरे झाल्यावर सभामंडपात वायव्यकोंपऱ्यांत आरसेमहालांत देवास नेऊन शेजारती करून निजवितात.

दर शनिवारीं चार घटिका रात्रीचे सुमारास नाना-प्रकारच्या सुगंधिक द्रव्यें करून देवास मंगलस्नान घा-लितात.

प्रतिसोमवारीं देवाचे मुखवट्यास रत्नजडित मुकुट, वस्त्रें, भूषणें व अलंकार घालून स्वारी पालखींतून मोठ्या समारंभानें वाजत गाजत कुशावर्तावर स्नानास नेतात.

याच प्रमाणें देवाचे स्वारीचा व महापूजेचा थाट महा-शिवरात्र, वैकुंठचतुर्दशी व ग्रहण या दिवशीं दृष्टीस पडतो.

दरसाल आश्विन शुद्ध अष्टमीचे दिवशीं ग्रामाधिकारी देव व देवी यांस नवीन पोषाक त्र्यंबकेश्वराकडून दिला जातो. नंतर विजयादशमीचे दिवशीं देवास नवीन पोषाक होऊन स्वारी पूर्वोक्त थाटानें मोठ्या समुदायासह कुशावर्तावर येऊन केदारेश्वरास पोषाक देऊन प्रयागती-

---

१ आराधी ह्मणून कोणी सुखवस्तु ब्राह्मण आहेत, ते ही पूजा बांधितात, व हा त्यांचा क्रम सतत तीन पिढ्यां-पासून चालला आहे.

र्थाकडे सीमोल्लंघनास जाते. तेथें शमीपूजन झाल्यावर परत येतांना रोषनाई व दारूकाम यांची बरीच मजा होते.

कार्तिकी पौर्णिमेचे दिवशीं देवाचा मुखवटा रथांत बसून रत्नजडित मुकुटासह कुशावर्तावर स्नानास नेतात. या वेळीं सुंदर रथांत देवाचा मनोहर मुखवटा विराजमान झाला आहे, वर चवऱ्या ढळत आहेत, मोरचेलें वारीत आहेत; ब्रह्मदेव सारथ्य करीत आहे, व ही अपूर्व शोभा पाहण्यांत हजारों लोकांची धांदल उडाली आहे; हें सर्व एकदम दिसतांच चित्तास अत्यानंद होऊन भाविक लोकांस त्रिविधतापाचें तिळप्रायही भान राहत नाहीं./

## स्थलवर्णन.

**लांबी, रुंदी व मर्यादा**—त्र्यंबकची चतुःसीमा लहान लहान खेड्यांनीं वेष्टित आहे; वस्तीची लांबी १२२९ हात व रुंदी ११३९ हात आहे.

**घरें व लोकसंख्या**—एकंदर घरांची संख्या ७०० आहे; पैकीं निम्में घरें ब्राह्मणांचीं आहेत. लोकसंख्या ३८०० असून त्यांत ब्राह्मणांची १५०० आहे.

**जनावरें**—ग्राम्यपशु सर्व प्रकारचें आहेत. डोंगरी प्रदेश असल्यामुळें क्रूर जनावरें असावीं; पण हल्लीं त्यांचें बहुशः स्वप्न झालें आहे. वानरें पुष्कळ आहेत; त्यांजपासून त्रास न व्हावा म्हणून गंगाद्वारीं जाणारे यात्रेकरू लोक त्यांजकरितां आपले बरोबर पावशेर, अच्छेर फुटाणे नेत असतात.

**वसूल**—येथील जमिनीचा वसूल सुमारें १००० रु. आहे.

**धंदा**—मुख्य भिक्षुकी, जुजबी शेती, व निर्वाहाचे पदार्थांचा व्यापार.

**डोंगर**—पूर्वी सांगितलेले ब्रह्मगिरी व नीलपर्वत हे दोनच डोंगर आहेत.

**नद्या**—ब्रह्मगिरीपासून पूर्वेस गोदावरी व अहिल्या, दक्षिणेस वैतरणा आणि पश्चिमेस पश्चिमवाहिनी गंगा ह्या निघतात. त्यांत समुद्रगामी वैतरणा ठाणें जिल्ह्यांत जाते. अहिल्या त्र्यंबकाजवळ व पश्चिमवाहिनी गंगा किकवी ह्या नांवानें चक्रतीर्थाजवळ गोदावरीस मिळते. नीलपर्वताकडील नीळगंगा गोदावरीस गांवांत मिळते. गंगालयाचे दक्षिण बाजूस जो ओढा आहे, त्यास म्हातारा ओहोळ ( वृद्धगंगा ) असें ह्मणतात.

**हेमाडपंती कृत्यें**—कुशावर्तापासून गोदावरीस दोहों बाजूंनीं सुमारें १२०० हात लांब घांट व गायत्रीचें देवालय वगैरे कामें चिरेबंदी बांधिलीं आहेत. हल्लीं हीं कामें फार नादुरुस्त झालीं आहेत.

**यात्रा व उत्साह**—दरवर्षी कार्तिकी पौर्णिमेस रथोत्साहाची, पौषवद्य एकादशीस निवृत्तिनाथाची, व महाशिवरात्रीस त्र्यंबकेश्वराची अशा तीन यात्रा अनुक्रमें २, ६ व १९ दिवस असतात.

रामनवमी, परशुरामजयंती व गोकुलाष्टमी हे उत्साह अनुक्रमें राम, परशुराम व कृष्ण यांचे मंदिरांत त्या त्या मंदिरांचे पुरस्कर्ते करितात. तसेंच दशाहारांत गंगेचा उत्साह कुशावर्तावर होतो.

**आखाडे**—बैरागी व गोसांवी यांनीं राहण्याकरितां बांधिलेल्या ठिकाणास आखाडा असें ह्मणतात. ते ६ आहेत.

१ अहब्बाणी ( नीलपर्वतावर ), २ निरवाणी ( प्रयागतीर्थावर ), ३ निरंजनी ( प्रयागतीर्थ व गंगा ह्यांचे मध्यें ), ४ कानफाट्यांचा ( गंगा व अहिल्या यांचे संगमावर ), ५ । ६ नवे जुने उदासी ( अहिल्या नदीचे पलीकडे ) ह्यांचे आहेत. शिवाय सुक्कड, लुक्कड आणि गोधड, लोधड हे सिंहस्थसालीं मात्र येऊन निरंजनी आखाड्याचे पलीकडे राहतात. निर्मळे ह्मणून कोणी साधुलोक गेल्या सिंहस्थापासून येऊं लागले आहेत; परंतु त्यांनीं अद्यापि आखाडा बांधिला नाहीं.

**अन्नसत्रें**—ह्या ठिकाणीं गाईकवाड सरकारांतून एक अन्नसत्र आहे, त्यांत दररोज खटपट्यांसुद्धां १२ पात्रांची नेमणूक आहे. आगंतुक ब्राह्मण न मिळाल्यास गांवांतील ब्राह्मणांस बोलावितात. सालमजकुरीं सिंहस्थ पर्वणीचे वेळीं श्रीमंत महाराज तुकोजीराव होळकर यांची स्वारी आली होती. त्या वेळेपासून त्यांनींही एक अन्नसत्र सुरू केलें आहे. त्यांत दररोज १५ पात्रांची नेमणूक आहे.

**धर्मशाळा**—चौधऱ्यांची व गद्यांची अशा दोन धर्मशाळा बऱ्याच जुन्या आहेत. पहिली पोलिसचे लोक राहण्यांत व दुसरी नागबलि नारायणबलि वगैरे करण्यांत

---

१ येथील संस्कृत पाठशाळेंतील गरीब विद्यार्थ्यांस ह्या सत्रांत श्रीमंत गायकवाड व होळकर सरकार जेवणाची परवानगी देतील तर फार चांगलें होईल.

गुंतलेली असते. आलीकडे गुजराथी लोकांच्या दोन धर्मशाळा झाल्या आहेत; परंतु त्यांत ते लोक व क्वचित् सरकारी अमलदार लोक यांशिवाय इतरांस जागा मिळत नाहीं. यामुळें गरीब यात्रेकरूंस जागेची मोठीच अडचण पडते. या गोष्टीकडे श्रीमान व धर्मात्मे लोक लक्ष देतील.

**हवा**—हें गांव समुद्राचे सपाटीपेक्षां २००० फूट उंचीवर आहे. येथील उन्हाळा फार सुखकर, पावसाळा संततधारेमुळें कंटाळवाणा; व बलवर्धक हिंवाळा किंचित् रोगकारक असतो.

**पाणी**—स्वच्छ आणि पाचक पाणी ह्या क्षेत्रांत दुर्मिळ आहे; परंतु कुशावर्त उन्हाळ्यांत उपसल्यानंतर त्याचें स्वच्छ आणि हलकें पाणी पाऊस लागेपर्यंत मिळतें.

**चमत्कार**—केव्हां केव्हां त्र्यंबकेश्वराचे पिंडींतून अरिष्टसूचक निळसर, तांबूस व पिवळट रंगांच्या ज्वाळा निघतात. सन १८५७ सालीं अशा ज्वाळा निघाल्या होत्या. तसें कधीं कधीं सिंहनादही होत असतो, असें पुष्कळ लोक खात्रीनें सांगतात.

**नवीन चाल**—मकर संक्रांतीचे दुसरे दिवशीं ह्या ठिकाणीं घोळाणा ह्मणून एक प्रकार करीत असतात. दोनप्रहरीं जेवणें आटोपल्यावर मंडळ्यांचे थवे हरभऱ्याचा कोंवळा पाला खुडून त्यांत दाळक्ष, हिंग, जिरें, मिऱ्यें, तिखट, मीठ व खोबरें ह्या जिनसा घालून सर्वांचा एक जीव होई पर्यंत हातावर चोळितात. नंतर त्यावर निंबू पिळून परस्परांस प्रीतिपूर्वक वांटितात. ही चाल दुसरे कोठें पाहण्यांत येत नाहीं.

**मेळा**—प्रत्येक बारा वर्षांनीं गुरु सिंह राशीस एकवर्ष पर्यंत असतो. त्या काळांस सिंहस्थ असें ह्मणतात. सिंह राशीस सूर्य असतां, गुरु सिंहेचा होतो. त्या वेळीं भागीरथी वगैरे महानद्या गोदावरीस भेटावयास येतात, त्या वर्षभर तेथें असतात. तोंपर्यंत तेथें स्नान करण्याचें मोठें माहात्म्य पुराणांत वर्णिलें आहे; यामुळें फारच मोठा मेळा या ठिकाणीं जमतो. दूरदूरचे ठिकाणांहून यात्रेकरी नेहमीं जात येत असतात. हीच कमाईची मोठी पर्वणी असल्यामुळें गांवांतील सर्व धंद्यांचे लोक आपापले उद्योग करण्यांत निमग्न असतात. पूर्वीं सांगितलेल्या आखाड्यांतील निरनिराळ्या पंथांच्या मोठमोठ्या झुंडी उत्तर हिंदुस्थानांतून [१]ध्वजापर्व साधण्याकरितां अगोदर येऊन राहतात. हें पर्व लागण्याचे सुमारास चालत आलेल्या मानपानाप्रमाणें प्रत्येक समाजाचा छबीना मोठ्या डौलानें कुशावर्तावर स्नानास येतो, व क्रमानें स्नानादिकर्मे झाल्यावर परत जातो.

ज्यावेळीं हे शिवभक्त स्नानें करण्यास जातात, त्या वेळची बहार काय वर्णावी ? प्रत्येक आखाड्याचा शिवचिन्हांकित विशालध्वज अग्रभागीं फडकत आहे; शंख, डमरु, शिंगें, कर्णे, भेरी, आदिकरून वाद्यांचे गजरानें सर्व दिशा दुमदुमत आहेत. गोसांवी व बैरागी यांचीं भस्म-

---

१ कुशावर्तावर गोसांवी व बैरागी आपआपल्या ध्वजां खालीं सिंहस्थ लागल्यावर जें पहिलें स्नान करितात त्यास ध्वजापर्व असें ह्मणतात.

धारण केलेलीं शरीरें अकटोविकट व तेजःपुंज दिसत आहेत; कितीएक व्याघ्रचर्म, कितीएक मृगाजिन, कितीएक भगवीं वस्त्रें व कितीएक रेशमीं वस्त्रें परिधान केलेले आहेत. कितीएक लंगोटबंद तर कितीएक नग्नच आहेत; कोणाच्या बगलेंत सोंटे, हातांत चिमटे व खांद्यावर त्रिशूल आहेत; दीर्घ जटाभार मस्तकाभोंवतीं अनेक तऱ्हांनीं गुंडाळिलेले आहेत; मुखानें "बं भोलानाथ" असा एकदम गजर करीत आहेत; अशा शिवगण सदृश चेल्यांच्या समुदायांत मध्यभागीं महंत शंकराप्रमाणें शोभत आहेत; अशी स्थिति दृष्टीस पडतांच पुराणांतरीं वर्णिलेल्या कैलासलोकींच आपण आहों कीं काय असें भाविक लोकांस वाटतें.

## कालपरत्वेंस्थिति.

उष्णकाळांत आसमंतातभागचे निर्झर प्रदेश व जलाशय शुष्क झालेले पाहून वृक्ष व वनस्पति आपले जीवनाभावाचे काळजीनें करपून गेलेल्या; गवत वाळून कोळ झालेलें; आश्रितांस पुष्टिसुख मिळत नाहीं; ह्मणून गिरि कष्टी झालेला रखरखीत व उदासवाणा दिसतो.

उन्हाळ्याचे अखेरीस वाऱ्यांचा सोंसाट, विजेचा चकचकाट व गर्जनेचा गडगडाट ह्यांसहवर्तमान मेघराजांची स्वारी कडाक्यानें येऊन श्रीशंकरचरणीं प्रथम हजीरी देते, आणि आपली तापशमनपटुता दर्शवून नित्य चरणसेवा संपादिते.

पावसाळ्यांत सरीवरसरी वारंवार येऊन जिकडेतिकडे पाणीच पाणी व चिखलच चिखल करून सोडीत आहेत; व त्यांत विहार करणारे दर्दुरादि प्राणी उड्या मारीत मारीत आनंदानें "डरांव डरांव" असा शब्दघोष एकदम करीत आहेत; लक्षावधि क्षुद्र काजवे श्वासोच्छ्वास सोडीत असतां, लक्कन उजेड पाडीत आहेत; पावसाचे झिमझिमींत व कर्दमांत चालण्याचे त्रासानें कांहीं मनुष्यें घरकोंबडे होऊन बसलीं आहेत; कितीएक घोंगड्या व विरलीं घेऊन आपापले उद्योगास रानांत जात आहेत; पर्जन्य निवारण करण्याचें साधन घेतल्यावांचून जे बाहेर पडले, ते भिजून चिंब झाल्यामुळें थवथवत घरीं येत आहेत; रानभर हिरवें गार गवत व मधून मधून धान्य उगवलेलीं शेतें दिसत आहेत, उंच डोंगरांवरून शुभ्र पाणलोट अतित्वरेनें गंगेकडे धांव घेत असतां, हलका-व्यानें उडणाऱ्या तुषार कोमल सूर्यकिरणांशीं संलग्न होऊन इंद्रधनुष्यें दाखवीत आहेत; अशा प्रकारची डो-ळ्यांस गारेगार करून देणारी शोभा जिकडे पाहावें तिकडे आहेच.

डोंगरांवर धुकें येऊं लागलें ह्मणजे पावसाळा संपण्याचे दिवस आले. या दिवसांत हवेंतील कोंदटपणा नाहींसा झाला आहे; पर्जन्यानें उखरवाखर झालेले घरासमो-रचे भाग नीटनेटके करून त्यांवर सडे घातले आहेत व रांगोळ्या काढिल्या आहेत; पहांटेच्यां रात्रीं तुंद झालेल्या गाई ह्मशींचीं दुधें काढावयाची व कार्तिकस्ना-नाची लगबग उडाली आहे; उद्योगी लोक थंडीस न

जुमानतां उत्साहानें आपापलीं कामें करण्यास जात आहेत; इकडे धुक्यानें गडप झालेले प्रदेश मित्रसाह्यानें प्रगट होत आहेत; तृणधान्यावर पडलेलें दंव विखरलेल्या मोत्यांसारखें दिसत आहे. हजारों पक्षी चारा मिळविण्याकरितां ह्या शेतावरून त्या शेतावर उडत आहेत; शेतकरी लोक आपल्या श्रमाचें फळ लवकरच मिळणार ह्मणून आनंदभरित झाले आहेत; कितीएक शेताचे राखणीकरितां गोफणीनें व आरोळ्या मारून पांखरांस हुसकीत आहेत; पतंग वगैरे चित्रविचित्र रंगांचीं पांखरें इकडूनतिकडे तळपत आहेत; वनशोभेनें जागोजाग रंगीबेरंगी वेलबुट्टीदार गालीचे पसरून बैठका केल्या आहेत आणि प्रेक्षकांचीं मनें मोहून टाकण्यांत जणुं ती गढूनच गेली आहे. अन्नास रुचि, पाण्यास चव आणि आंगांत तरतरी देणारा हिंवाळा वरील चमत्कृति दाखवून लोकांस अत्यंत आवडता होतो.

## सांप्रतची सुधारणा.

हा पूर्वी पेश्वाचा गांव असून हल्लीं नासिक तालुक्यांत मोडतो. येथें पोष्ट, पोलिसग्याट, म्युनिसिपालिटी, शाळा आणि पुस्तकालय हीं आहेत.

**पोष्ट ऑफिस**—आलीकडेसच स्थापन झालें आहे, यामुळें लोकांस पुष्कळ उपयोग होतो.

**पोलिस**—ठाणें उठल्यावर आसपासचे गांवचे बंदोबस्ताकरितां दोन शिपाई व एक हुद्देदार असतो.

**म्युनिसिपालिटी**—सन १८६६ ह्या वर्षी स्थापन झा-

ली. उत्पन्न सुमारें २२०० रुपये असून खर्चही त्याच मानानें आहे. रस्ते मात्र चांगले झाले आहेत. अवश्यमेव जी पाण्याची स्वच्छता व सोय ती झाल्यावांचून नारू वगैरे आजार कमी होणार नाहींत.

**शाळा**– १ संस्कृत, १ मराठी मुलांची व १ मुलींची आणि १ नीच जातीची अशा एकंदर ४ आहेत. संस्कृत पाठशाळेशिवाय दुसऱ्या शाळा सरकारी खर्चानें चालतात. संस्कृत पाठशाळा ग्रामस्थ लोक व श्रीमंत अण्णासाहेब विंचूरकर यांचे आश्रयानें नुकतीच स्थापन झाली आहे. ही निरंतर चालावी ह्मणून तिजकरितां रक्कम जमाकरण्याची तजवीज चालू आहे, व श्रीमंत महाराज तुकोजीराव होळकर यांनीं ही मदत देण्याचें अश्वासन दिलें आहे.

**पुस्तकालयें**–त्र्यंबक पुस्तकालय हें कै० शिवराम अनंत लेले ह्यांनीं स्थापन केलें, व त्यास उदार बुद्धीनें पुष्कळांचें साह्य मिळून हल्लीं तें भरभराटींत आहे. दुसरें वे० राघोबा तानपाठकी ह्यांनीं नुकतेंच स्थापन केलें आहे.

**सूचना.**–ह्या क्षेत्रांत पुष्कळांनीं देवळें बांधण्याकडे अतोनात द्रव्य खर्च केलें आहे; परंतु त्यांच्या नेहमींच्या उस्तवारीची योजना करून ठेविली नसल्यामुळें तीं आतां नादुरुस्त होऊन पडलीं आहेत. त्यां पैकीं एखाद्या देवळास लागलेला पैसा जर वेदाचे किंवा शास्त्राचे शाळे करितां ठेवून व्याजांत शाळा चालविली असती, तर त्याची कीर्ति अजरामर होऊन पुष्कळांस विद्यामृताचा लाभ झाला असता. आतां तरी नूतन स्थापन झालेल्या पाठशाळेस सर्वा-

कडून उदार आश्रय मिळून ती चिरायु व्हावी, अशी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

## भाग ४ था.

## पौराणिक कथाभागाचें सार.

**क्षेत्रमहिमा**—ब्रह्मदेवाच्या शापानें त्र्यंबक (तीन आहेत अंबकें ह्म० नेत्रें ज्यास असे शंकर.) ह्या ठिकाणीं येऊन राहिले, ह्मणून ह्या क्षेत्रास त्र्यंबकक्षेत्र असें नांव पडलें. शंकराची वस्ति यास्थलीं निरंतर होऊं लागल्यामुळें इंद्र, ब्रह्मा, विष्णु आदिकरून देवही ईश्वरासंनिध राहूंलागले. ते ज्या पर्वतावर राहत, त्यांस त्यांचींच नांवें पडलीं. ह्या क्षेत्राच्या महिम्याचें वर्णन, चारवेद, सहा शास्त्रें व अठरा पुराणें ह्यांनाही करवलें नाहीं. गंगापूजन व शंकराराधना केल्यानें मनुष्य सर्व पातकांपासून मुक्त होतो, व त्याचे सर्व हेतु सफल होतात.

**ब्रह्मगिरि**—ब्रह्मदेवानें शंकर प्रसन्न होण्याकारितां ह्याठिकाणीं तपश्चर्या केली, ह्मणून ह्या पर्वतास हें नांव पडलें. ह्याची जो प्रदक्षिणा करील, त्यास ऐहिक सर्वसुखें प्राप्त होतील.

**गंगा**—पूर्वी गौतमऋषि ह्या ठिकाणीं तपश्चर्या करीत असतां देशांत अवर्षण पडल्यामुळें, निर्वाहासाठीं चार वर्णांचे लोक येथें येऊन राहिले. अशा संकटसमयीं आपल्या तपःसामर्थ्यानें नित्य धान्य पिकवून त्या सर्वांचा चरितार्थ गौतमानें चालविला. असा क्रम

चालत असतां एके दिवशीं एक+गाय गौतमाचे शेतांत गेली. तिचें निवारण करण्याकरितां गौतमानें दर्भ सोडिला. तेंच दुर्निवार शस्त्र होऊन धेनु मृत झाली. गोहत्येचें पातक जाण्याकरितां गंगा भूमंडळीं आणिल्यास तूं शुद्ध होशील. असें ब्राह्मणांनीं जगताच्या उद्धाराकरितां गौतमास सांगितलें. त्यावरून गौतमऋषींनीं तपश्चर्या करून शंकर प्रसन्न झाल्यावर, तुझ्या जटेंत राहणारी गंगा भूमंडळीं आमचा उद्धार करण्यास द्यावी, असें वरप्रदान मागितलें. तेव्हां शंकरानें प्रसन्न होऊन गंगेस मृत्युलोकीं जाण्यास आज्ञा दिली; परंतु ती भूमंडळीं संतोषानें जाईना. यामुळें शंकरांस राग-येऊन ह्यांनीं जटा आपटल्या त्याबरोबर गंगा पतन पावली. तींत गौतमानें स्नान केल्यावर गोहत्येचें पातकांतून मुक्त झाला. जे पातकी दूर असतां गंगा (गोदावरी ) या शब्दाचा उच्चार करितील, त्यांचीं पापें नाहींशीं होऊन त्यांस वैकुंठ प्राप्ति होईल; व यात्रेस

---

+ ग्रंथांतरीं— पार्वतीस गंगेविषयीं सवतीमत्सर उत्पन्न होऊन तिनें गंगेस भूमंडळीं घालविण्याविषयीं गणपतीस सांगितलें. त्यावरून गणपतीनें मायिक धेनु उत्पन्न करून तिला शेतांत पाठविली. तिजवर गौतमानें दर्भ टाकितांच तिनें प्राण सोडिला. गौतम बहिष्कृत आहे. आणि तो भूमंडळीं गंगा आणिल्या वांचून शुद्ध होणार नाहीं. अशी बुद्धिही त्यानेंच ब्राह्मणांच्या मनांत उत्पन्न केली.

येतील ते पितरांसह उद्धरतील; आणि शंभर योजनाचे आंत मृत होतील ते शिवलोकाप्रत जातील. गंगेच्या स्मरणानें अंतःकरण, स्तुतीनें वाणी, व स्नानानें शरीर पवित्र होतें याप्रमाणें त्रिविध पातकें दूर होऊन मुक्ति प्राप्त होते.

**गंगाद्वार**—गंगा प्रथम येथें उत्पन्न झाली, ह्मणून ह्या ठिकाणास गंगाद्वार हें नांव पडलें. येथें यथाविधि स्नान दानादि कृत्यें करणारास महत्पुण्य प्राप्त होतें.

**कुशावर्त**—ह्या ठिकाणीं गौतमानें गंगेस कुशानें मर्यादितकरून त्यांत रहावें असें केलें आहे. येथें यथाशास्त्र तीर्थविधि करणारांचीं उभयकुळें उद्धरतात.

| | |
|---|---|
| कंचन.<br>कनखल<br>बिल्वतीर्थ<br>प्रयागतीर्थ | ह्या प्रत्येक तीर्थाचें स्नान, दर्शन, वंदन हीं घडल्यानें पापाची शुद्धि व मनोरथ प्राप्ति होते. |

सारांश, ह्या क्षेत्रांत सर्व तीर्थें गंगारूपी व सर्व देव शंकरमय आहेत यामुळें जो कोणी ह्या क्षेत्रांत येऊन निदान एक रात्रतरी वास करील त्यास ऐहिक सुखें प्राप्त होऊन अंतीं शिवलोकप्राप्ति होईल

**येणें प्रमाणें पौराणिक भागांचें संक्षेपेंकरून वर्णन दिलें आहे.**

# देवळें, तीर्थें वगैरे बद्दल माहिती.

| | देवळें वगैरेचीं नांवें. | कोणी बांधिलें | कधीं बांधिलें | खर्चाचा अंक | विशेष माहिती |
|---|---|---|---|---|---|
| १ | ओकांचा गणपति. ( कोठीजवळ ) | लाडमजीचौधरी. | शोध नाहीं. | शोध नाहीं. | |
| २ | मारुतीचें देवालय. ( गांवचे तोंडाशीं ) | शोध नाहीं | ,, | ,, | गांवकरी यांनीं चारशें रुपये खर्चून हल्लीं बांधिलें आहे. |
| ३ | शनि( मारुतीजवळ) | रघुनाथबावा चौधरी. | शके १७२४ | तिनशेरुपये | |
| ४ | विष्णु मंदिर ( त्र्यंबकेश्वराचे कोटाचे ईशान्येस) | हेमाडपंती. | शोध नाहीं. | शोध नाहीं. | हल्लीं देवालय नादुरुस्त आहे. |
| ५ | संगमेश्वर ( अहिल्या व गोदावरी ह्यांचे संगमावर) | हेमाडपंती. | ,, | ,, | ह्याचेपुढें संगमतीर्थ नांवाचें तळें आहे हल्लीं दोन्ही कामें नादुरुस्त आहेत. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | त्र्यंबकेश्वर | पेशवे | शके १६७७ / १७०८ | नऊलक्षरुपये. | विशेष वर्णन मागें केलें आहे. |
| ७. | त्रिसंधेश्वर ( त्र्यंबकेश्वराचे दक्षिणेस ) | बापूभट्ट कार्लेकर. | शोध नाहीं. | शोध नाहीं. | ह्यास क्षेत्राधिपाति असें ह्मणतात. |
| ८ | गायत्रीदेवी ( त्रिसंधेश्वराजवळ ) | हेमाडपंती. | ,, | ,, | ह्यादेवीस टपकाई असें ह्मणतात. |
| ९ | त्रिभुवनेश्वर ( कोठीजवळ ) | अहिल्याबाई-होळकरीण. | शके १७०१ | बावीसशेंरु० | होळकरांकडून पूजेचा बंदोबस्त आहे. |
| १० | दत्तमंदिर ( पुलाजवळ ) | गंगाधर मोरेश्वर निरंतर. | शोध नाहीं. | शोध नाहीं. | हें पूर्वी दंडवते ह्यांचें घर होतें. तें त्यांनीं निरंतर व कळमकर ह्या उपनांवांचेगृहस्थांस दिलें होतें. ह्या देवालयाचे ठिकाणीं पूर्वी दत्तमूर्ति होती. |
| ११ | सत्यनारायण ( बाजारांत ) | शोधनाहीं. | ,, | ,, | |
| १२ | ज्वरेश्वर ( कनखल तीर्थाचे दक्षिणेस ) | सखारामबापू बोकील. | शके १७२० | सातशेंरुपये. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३ | राममंदिर(कुशावर्ताजवळ) | पेशवे. | शके १६६५ | अकराहजार रुपये. | ह्याबद्दल वर्णन मागें केलें आहे. या देवळापुढें पूर्वेस गंगेची मनोहर मूर्ति बसवून तिजकरितां गंगामहाल बांधण्याचें काम ग्रामस्थांकडून सुरू आहे, त्यासर्वांनीं उदार आश्रय देणेंयोग्यआहे. |
| १४ | कंचनेश्वर (कंचनतीर्थाजवळ) | शिवभट्ट खरे. | शके १६९५ | तीनहजार रुपये. | |
| १५ | केदारेश्वर (कुशावर्ताजवळ) | रावजी महादेव पारनेरकर | शके १६७२ १६९० | कुशावर्ताचे खर्चांत. | ह्या देवास त्र्यंबकेश्वराकडून सन्मान मिळतो, व हे स्थान पुरातन आहे. |
| १६ | इंद्रेश्वर (इंद्राळयाजवळ) | विष्णु महादेव गद्रे. | शके १७१० | पन्नासहजार रुपये. | |
| १७ | कृष्णमंदिर (कुशावर्ता- | यजुःशाखेचे | शोध नाहीं. | पंधराशेंरुपये | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | चे पश्चिमेस ) | ब्राह्मण. | | | |
| १८ | बल्लाळ विनायक व बल्लाळतीर्थ ( कृष्णमंदिराचे पाठीमागें. ) | रघुनाथराव पेशवे. | शके १७०४ | तीसहजाररु० | अवांतर देवांच्या पूजेबरोबर ही पूजा होते. |
| १९ | निवृत्तिनाथाचें देऊळ व धर्मशाळा. (गंगालयाचे पश्चिमेस. ) | लक्ष्मणलालमण (जोगळेकरांचा शिपाई. ) | शके १७३४ | पंचवीसशें रु० | हा साधु प्रसिद्ध ज्ञानेश्वराचा बंधु होय. मंदिर समाधीवरबांधिलें असून सभोंवती धर्मशाळा व मंडप संतांनीं (वारकऱ्यांनीं) बांधिलाहोता. हीं सर्व कामें जळून गेलीं यामुळें सुंदराबाई नांवाची कोणी विधवा स्त्री देवळांचे दगडी काम लोकाश्रयानें बांधीत आहे. |
| २० | भुवनेश्वरी. | शोध नाहीं. | शोध नाहीं | शोध नाहीं. | हें देवालय जुनाट असून थोडे दिवसां पूर्वीं माहीमचे दांडेकर यांनीं दुरुस्त केलें आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २१ | काशी विश्वेश्वर( जोगळेकरांचे घराजवळ ) | नारो गोविंद जोगळेकर. | ,, | एकहजार-रुपये. | |
| २२ | परशुराममंदिर ( कोंकणस्थआळींत. ) | कोंकणस्थ ज्ञाति. | सन १८७३ १८८० | सातहजार रुपये. | सर्वखर्चवर्गणीनेंजमाकेला, ह्यादेवाचेअर्चेचेदिवशींजव्हारचेश्री० पतंगशाहा यांनीं देवासपूजा, नैवेद्य वगैरे करितां १०० रुपयांचें वर्षासन करून दिलें आहे. |
| २३ | रामेश्वर ( गौतमतलावा जवळ ) | वामनशा० खाडिलकर. | शके १७१४ | अडीचशेंरुपये. | देऊळबांधणारे हे शास्त्रविद्यापारंगत असल्याची प्रसिद्धी आहे. |
| २४ | श्रीराममंदिर ( देवळीकरांचे होळीजवळ. ) | देशस्थजाति | शोधनाहीं. | शोध नाहीं. | |
| २५ | गौतमेश्वर ( सरकारीशाळेजवळ ) | नारो दामोदर पंडित(झांशीवाले.) | | साठहजार रुपये. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २६ | खंडोबा ( नीळपर्वताचे पायथ्यास. ) | ग्रामस्थ. | " | अजमासेंचारशें रुपये. | हें देऊळ हल्लीं नादुरुस्त आहे. |
| २७ | नीलांबिका ( नीळपर्वतावर ) | अहब्बणी. गोसांवी. | सं० १११४ | अकराशें रु० | नीळपर्वतावर देवीच्यादर्शनास जाग्यास अवघड वाटेंत मुंबईचे प्रसिद्ध कपोलगुजर यांनीं १६ हजार रु०खर्चून ३५०पायऱ्या बांधिल्या आहेत. |
| २८ | दत्तमंदिर (नीलांबिकेच्यापश्चिमेस ) | अहब्बणी गोसांवी. | संवत् १११४ | तीनशेंरुपये. | देवळाच्या दगडावर संवत खोदिलेला आहे. |
| २९ | मुकुंदेश्वर ( महामारीचेउत्तरेस ) | धनशेट शिंपी मुंबईकर. | शके १७१४ | पंधराहजाररुपये. | |
| ३० | महामारी. | मिठाभाई चौधरी. | शके १७२४ | तीनशें रुपये. | हें देऊळ हल्लीं गांवकरी यांनीं दुरुस्तकेलें आहे. |

# तीर्थें.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रयागतीर्थ(त्र्यंबकगांवचेपूर्वेसदीडमैलावर ) | अहिल्याबाई होळकरीण. | शके १७०२ | पन्नास हजार रुपये. | जवळच वैराग्यांस राहण्या करितां इमारतबांधून कांहींस्वास्थ्य ही करून दिलें आहे. |
| २ | अमृतकुंड. | याबद्दल | सर्व | माहिती त्र्यंबकेश्वराचे | वर्णनांत आहे. |
| ३ | कंचनकनखल (कुशावर्ताचें जवळच पूर्वेस ) | विष्णु महादेव गद्रे. | शके १७०७ | नऊ हजार रुपये. | या तीर्थास कुशावर्ताचें पाणी येतें. पहिल्यांत ब्राह्मणांचे व दुसऱ्यांत शूद्रांचे पिंड टाकितात. कनखल (कण ह० धान्य त्याचें खळ ह० मळण्याचीजागा) येथें गौतमऋषि धान्य मळीत होते. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | कुशावर्त. | रावजी महादेव पारनेरकर. | श० १६७२ श० १६९० | देऊळ व धर्मशाळा मिळून सातलक्षरु० | साग्र वर्णन मागेंच केलें आहे. |
| ५ | गंगासागर ( गंगालय ) गांवचे पश्चिमेस. | नारोशंकर राजेबहादर | श० १६९९ | पन्नास हजार रुपये. | ह्यातलावापासून कुशावर्तास. गांवांतलि आडांस व विहिरींस पाण्याचा पुरवठा होतो, त्याची पू. प. लांबी ५७८ फू. वद. उ. रुंदी. ४२५ फूट आहे. ह्या तलावांत एक हे गाडपंती लहानसा तलाव आहे, |
| ६ | रामलक्ष्मणतीर्थ ( गंगाद्वारच्या अर्ध्यापायऱ्या चढल्यावर. ) | गोपाळपंत घाणेकर. | शके १७२२ | पंचवीसशें रुपये. | येथें दोन कुंडें असून पहिले कुंडांत औदुंबराखालून गंगेचा ओघ कुंडांत पडतो. जवळ रामाचें देऊळ आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | गंगाद्वार व वराहतीर्थ (ब्रह्मगिरीच्या उत्तर-भागाकडे अर्धा चढाव चढल्यावर ) | शोधनाहीं. | श० १७२० | १८०० रु० | मूळगंगा येथून निघते. जवळच लहानसें कुंड आहे त्यांतून प्रवाह वराहतीर्थांत जातो. व हें तीर्थ पर्वतास भुयाराप्रमाणें खडक खोदून केलें आहे. उत्तरेस कोळांबिकादेवी आहे. पुढें अष्टोत्तरशत लिंगें व पलीकडे गोरखगुहा आहे. गंगाद्वारीं जाण्यास बिकट रस्ता होता. तेथें मुंबईचे प्रसिद्ध हंसराजकरमशी यांनीं ४० हजार रु० खर्चून पायऱ्या बांधिल्या आहेत. त्या मुळें गंगाद्वारीं जाण्यास सोय चांगली झाली आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | बिल्वतीर्थ ( नीळपर्वताचे उत्तरेस ) | नारायण विनायक गोगटे | शके १७६६ | पांच हजार रुपये. | येथें जवळच त्र्यंबकेश्वराचा बाग आहे त्यास त्याच तलावाचे पाण्याचा पुरवठा होतो. |

विहिरी

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | केतकी विहीर ( कुशावर्ताचे पूर्व पटांगणांत ) | शोध नाहीं. | शोध नाहीं. | शोध नाहीं. | हिला कुशावर्ताचे पाण्याचा पुरवठा होतो. पाणी हलकें व पाचक, या मुळें फारलोक पाणी पितात. |
| २ | ठाकूर विहीर. | त्र्यंबकम्युनिसिपालिटी. | सन १८६५ चे सुमारास. | तीनशें रुपये. | आरंभीं ठाकूर व वारली यांचा पाणी भरण्याचा येथें झरा होता. |
| ३ | मनकर्णिका व वाराणशी तीर्थें ( दीक्षितांचे घराजवळ ) | शोध नाही. | शोध नाही. | शोध नाही. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | निवृत्तीजवळील विहीर (गंगाल्याचे उत्तरेकडील बाजूस ) | आंबाताई लंगोटी | श० १७६४ | पांचशें रु० | भोंवतालचे झाडांचा पाचोळा पाण्यांत पडतो. या मुळें निवृत्तीच्या यात्रेस येणाऱ्या लोकांस दखील त्या पाण्याचा उपयोग होत नाहीं. |

## तलाव.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | गौतमतलाव ( सरकारी शाळेजवळ ) | नारो दामोदर पंडित ( झांशीवाले ) | शोध नाहीं. | गौतमेश्वराचे देवळाचे खचांत | तलावाची लांबी पू. प. ६१९ फूट व रुंदी द. उ. ३५० फूट आहे. तलाव मोठा आहे, तरी पाणी अस्वच्छ असल्यामुळें व्हावा तितका उपयोग होत नाहीं. |
| २ | इंद्राळें ( कुशावर्ताचे पूर्वेस ) | विष्णुमहादेव गद्रे. | शके १७१० | इंद्रेश्वराचे देवळाचे खर्चांत | याची बांधणी उत्तम असून ते वस्तींत आहे. परंतु पाण्यांत गोंडाळ फार असते. |

( ६१ )

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | विसोबाचें तळें (गांवाचे दक्षिणेस अहिल्या नदीचे कांठीं ) | विसाजीपंत केळकर ( जुन्नरचे नारोपंत आमडेकर यांचेकारकून) | शके १७०० | पंचवीसहजार रुपये. | पाणी विपुल असून स्वच्छ आहे. ह्याचा उपयोग उन्हाळ्यांत पिण्याकडे फार होतो. |
| ४ | मोतीतलाव ( नीळगंगेचे पलीकडे ) | मोतीभाई चौधरी | शके १७१२ | सतरा हजार रुपये. | पाणी उपसाऱ्याचे उपयोगीं पडतें |
| ५ | मुकुंदतीर्थ ( महामारीचे उत्तरेस ) | धनशेट शिंपी मुंबईकर | शके १७१४ | मुकुंदेश्वराचे देवळाचे खर्चांत. | या तीर्थांत उन्हाळ्यांत पाणी नसतें. |

यां शिवाय लहान सहान देवळें, तीर्थें, विहिरी व तलाव अनेक आहेत.

**समाप्त.**

१८७१८ (६२)

REFBK-0019719

# जाहिरात. किं.

| | | |
|---|---|---|
| १ त्र्यंबकवर्णन त्र्यंबकेश्वराचे देवळाचे चित्रासह आवृत्ति दुसरी.... .... | ०३ | ००६ |
| २ पंचवटीवर्णन, राममंदिराचे चित्रासह. | ०२ | ००६ |
| ३ विद्यार्थ्यांचा सोबती.... .... .... | ०२ | ००६ |
| ४ यु०चे सिद्धांताचें १लें पुस्तक २री आ. | ०४ | ००१ |
| ५ अंकगणित प्रश्नसंग्रह ( बर्नार्ड स्मिथ अर्थमिटिकच्या प्रश्नसमुदायाचे २९ भाग सोडविलेले. .... .... | ०७ | |
| ६ नासिक जि० चें वर्णन. .... .... | ००९ | ०० |
| ७ महाराष्ट्रदेशाचें वर्णन कोल्हापुरचे वर्णनासह.... .... .... .... .... | ०२ | ००५ |
| ८ कोष्टकपत्रक भांजणीचे उदाहरणासह | ००६ | ०० |

नंबर १।२।३।६।८चें टपाल हांशिलां अनुक्रमें प्रती २।४।३।१९।३०पर्यंत जातील नंबर १।२।३।४।५।७।ह्या पुस्तकांस दहा प्रतींस १प्रत कमिशन मिळेल, व नं० ८ च्या २२प्रतींस एक प्रत कमिशन मिळेल. टपालखर्च शिवाय पडेल. हीं पुस्तकें नासिक येथें किताबखान्यांत व मालेगांव येथें बाळकृष्ण बाबाजी करकरे हेडमास्तर नंबर १ह्यांजकडेस व खालीं सही करणारांकडेस मिळतील, नाडपड पत्र घेतलें जाणार नाहीं. **गो० वा० वैद्य.**

हे. मा. नासिक शा. नं. ३.

नंबर ४।५ हीं पुस्तकें मार्च अखेर तयार होतील.